
मराठी

# सुलभभारती

इयत्ता आठवी



- तुम्हांला कोणते ना कोणते तरी स्थळ पाहायला नक्कीच आवडत असेल. खाली काही प्रश्न व मुद्दे दिले आहेत, त्या आधारे माहिती लिहा.

तुमचे आवडते स्थळ

येथे आवडणाऱ्या स्थळाचे चित्र लावा.

१ हे स्थळ कोणत्या गावातील/जिल्ह्यातील/राज्यातील/देशातील आहे?

२ हे स्थळ आवडण्याचे मुख्य कारण कोणते?

३ या स्थळाची भौगोलिक वैशिष्ट्ये.

४ या स्थळाची संस्कृती व परंपरा.

५ तेथील लोकजीवन.

६ या स्थळाची ऐतिहासिक माहिती.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# सुलभभारती

## इयत्ता आठवी

### (द्वितीय भाषा)

(हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी.)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

P52HCJ

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
श्रीमती माधुरी जोशी (सदस्य)
श्री. शिवाजी तांबे (सदस्य)
डॉ. सुजाता महाजन (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्रीमती स्वाती ताडफळे | प्रा. विजय राठोड | श्रीमती नेहा रावते |
| डॉ. नंदा भोर | श्री. देविदास तारू | श्रीमती अन्वया काणे |
| डॉ. शारदा निवाते | श्रीमती प्रांजली जोशी | श्रीमती सुप्रिया खाडिलकर |
| श्रीमती अनुजा चव्हाण | श्रीमती वैदेही तारे | श्री. सुनिल बनसोडे |
| श्री. मोहन शिरसाट | डॉ. सुभाष राठोड | डॉ. जगदीश पाटील |
| श्री. प्रवीण खैरे | श्री. नाना लहाने | श्री. रमाकांत देशपांडे |
| श्री. प्रमोद डोंबे | श्रीमती प्रतिभा लोखंडे | श्री. नामदेव एडके |
| श्री. समाधान शिकेतोड | श्रीमती जयमाला मुळीक | श्री. रविंद्रदादा डोंगरदेव |
| श्री. बापू शिरसाठ | डॉ. मंजूषा सावरकर | श्री. दिलीप देशपांडे |
| श्री. मयुर लहाने | श्रीमती स्मिता जोशी | |

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**निमंत्रित तज्ज्ञ**
श्री. हरी नारलावार

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : गौरव गोगावले

**मुखपृष्ठ** : गौरव गोगावले

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर, निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2018-19/

**मुद्रक** :

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता आठवीच्या वर्गात स्वागत आहे. 'सुलभभारती' हे मराठी द्वितीय भाषेचे तुमच्या आवडीचे पुस्तक! हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातांत देताना मनस्वी आनंद होत आहे.

मित्रांनो, मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. एकमेकांशी संवाद साधताना, विचारांची देवाणघेवाण करताना, आपल्या भावना समोरील व्यक्तीसमोर मांडताना या भाषेचा प्रभावी व योग्य वापर करणे आवश्यक असते. यासाठी आपले आपल्या भाषेवर प्रभुत्व हवे. या पाठ्यपुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व नक्कीच वाढणार आहे, तसेच भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमणार आहे.

या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला वेगवेगळ्या साहित्यप्रकारांची ओळख करून दिली आहे. त्याचा अभ्यास केल्याने मराठी भाषेचे शब्दवैभव किती विविधांगी आहे, हे तुमच्या लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे मुख्य साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा यासाठी या पुस्तकात अनेक कृती दिल्या आहेत. उदा., 'वाचा', 'चर्चा करूया', 'खेळूया शब्दांशी', 'लिहिते होऊया', 'शोध घेऊया', 'भाषेची गंमत', 'कल्पक होऊया', 'विचार करा. सांगा.', 'चला संवाद लिहूया', 'भाषासौंदर्य' यांसारख्या अनेक भाषिक कृती इत्यादी. पाठ्यपुस्तकातील 'उपक्रम' व 'प्रकल्प' यांमुळे तुम्हांला मिळवलेल्या ज्ञानाची सांगड दैनंदिन जीवनाशी घालून ते ज्ञान स्वप्रयत्नाने पक्के करता येणार आहे.

रोजच्या जीवनात तुम्ही तंत्रज्ञानाचा वापर करतच आहात. त्या दृष्टीने पाठ्यपुस्तकात विविध कृती योजल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने या कृतींचा अभ्यास तुम्हांला करायचा आहे. 'मैत्री तंत्रज्ञानाशी' या शीर्षकाखाली दिलेल्या नवीन माहितीचा उपयोगही तुम्हांला दैनंदिन व्यवहारात करायचा आहे. त्याचबरोबर 'आपण समजून घेऊया' या शीर्षकाखाली भाषाभ्यासाच्या दिलेल्या विविध कृती समजून घेऊन त्या सोडवायच्या आहेत. या सर्व प्रकारच्या भाषिक कृती करताना तुम्हांला नक्कीच मजा येणार आहे.

तुम्हां सर्वांना हे पाठ्यपुस्तक नक्कीच आवडेल अशी आशा आहे. तुमच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा !

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ एप्रिल २०१८, अक्षय्य तृतीया
भारतीय सौर : २८ चैत्र १९४०

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : द्‌वितीय भाषा मराठी आठवी

| अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना – <br>• आपल्या भाषेत बोलण्याची, चर्चा करण्याची, विश्लेषण करण्याची संधी दिली जावी. <br>• जीवनाशी संबंध जोडून विषय समजण्याच्या संधी दिल्या जाव्यात. <br>• वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी. <br>• गटात कार्य करणे आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे-घेणे, प्रश्न विचारणे यांचे स्वातंत्र्य दिले जावे. <br>• मराठीबरोबरच आपल्या भाषांतील साहित्य वाचण्याचे, लिहिण्याचे आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे. <br>• आपला परिसर, काळ आणि समाज यांच्याशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी. <br>• आपल्या भाषेची रचना करत असताना लिहिण्याच्या संदर्भातील क्रियाही आयोजित कराव्यात. उदा., शब्दखेळ, अनौपचारिक पत्र, कोडे, संस्मरण इत्यादी. <br>• सक्रियता आणि जागरूकता आणणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्रे, पत्रिका, चित्रपट आणि दृक्‌श्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची संधी दिली जावी. <br>• कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा विकास करण्याचे उपक्रम – अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सर्जनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद | इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसंदर्भात अपेक्षित अध्ययन निष्पत्ती– <br>• विविध विषयांवर आधारित विविध प्रकारचे साहित्य वाचून त्यावर चर्चा करतात. (उदा., पाठ्यपुस्तकातील एखाद्या पक्ष्याविषयीची माहिती वाचून पक्ष्यांविषयी लिहिलेले पुस्तक वाचतात व चर्चा करतात.) <br>• मराठी भाषेतील विविध प्रकारचे साहित्य/मजकूर (वर्तमानपत्रे, मासिके, कथा, इंटरनेटवर प्रसिद्‌ध होणारे इतर साहित्य) समजपूर्वक वाचतात, त्यांविषयी आपली आवड-नावड, मत, निष्कर्ष इत्यादी. तोंडी/सांकेतिक भाषेत व्यक्त करतात. <br>• वाचलेल्या साहित्यावर विचार करतात आणि अधिक समजून घेण्यासाठी प्रश्न विचारतात, चर्चा करतात. <br>• आपल्या परिसरातील विविध बोलींतील लोककथा, लोकगीते यांविषयी सांगतात/बोलतात. <br>• अपरिचित घटना, प्रसंग आणि परिस्थितीची कल्पना करतात आणि यांबाबत मनात तयार होणाऱ्या प्रतिमा व विचार यांबद्‌दल सांगतात व लिहितात. <br>• विविध संवेदनशील मुद्‌द्यांविषयी (उदा., जाती, धर्म, वर्ण, लिंग, रीतिरिवाज यांबाबत) आपले मित्र, शिक्षक आणि कुटुंबातील सदस्य यांना प्रश्न विचारतात. (उदा., परिसरातील लोकांच्या सण साजरे करण्याच्या पद्‌धतींबद्‌दल बोलणे.) <br>• एखादे साहित्य वाचून त्यातील सामाजिक मूल्यांविषयी चर्चा करतात, त्याची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. (उदा., शेजारच्या रामूकाकांची मुलगी शाळेत का जात नाही?) <br>• विविध प्रकारचे साहित्य जसे- कथा, कविता, लेख, अहवाल, वृत्तान्त, स्मरणपत्र, व्यंगचित्र, निबंध इत्यादींचे बारकाईने वाचन करून त्यांविषयी अनुमान काढतात, त्याचे विश्लेषण करतात, त्यांतील प्रमुख मुद्‌दे शोधतात. |

| अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित हस्तलिखित आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>• शाळा/विभाग/इयत्ता यांची पत्रिका भित्तिपत्रिका तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे. | • वाचलेल्या साहित्यातील नवीन शब्द, वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते यांचे अर्थ समजून घेतात, आस्वाद घेतात व उपयोग करतात.<br>• कथा, कविता वाचून लेखनाचे विविध प्रकार व शैली ओळखतात. (उदा., वर्णनात्मक, भावात्मक, निसर्गचित्रण.)<br>• एखादा मजकूर वाचताना तो समजून घेण्यासाठी आवश्यकतेनुसार वर्गमित्र/शिक्षक यांची मदत घेऊन उपयुक्त संदर्भसाहित्याची (शब्दकोश, विश्वकोश, इंटरनेट किंवा अन्य पुस्तकांची) मदत घेतात.<br>• विविध प्रकारचे साहित्य वाचताना (कथा, कविता, जाहिराती इत्यादी.) त्याच्या रचनेचा आस्वाद घेतात आणि त्यांबाबत आपापल्या कुवतीनुसार तोंडी, लेखी स्वरूपात विचार व्यक्त करतात.<br>• वाचन व लेखनाचा उद्‌देश लक्षात घेऊन आपले विचार प्रभावीपणे मांडतात.<br>• स्वत:चे अनुभव स्वत:च्या भाषाशैलीत लिहितात. लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करून अनुभवलेखन करतात. (उदा., कथा, कविता, निबंध अशा वेगवेगळ्या पद्‌धतीने अनुभव लेखन करणे.)<br>• दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्ट्यपूर्ण घटना, स्थिती, अनुभव यांवर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात. (उदा., सोशल मिडीयावर लिहिणे, संपादकांना पत्र लिहिणे.)<br>• विविध कलांमध्ये (उदा., हस्तकला, वास्तुकला, कृषिकला, नृत्यकला, चित्रकला) वापरल्या जाणाऱ्या भाषेचा सर्जनात्मक वापर करतात.<br>• अभिव्यक्तीच्या विविध शैली व रूपे ओळखतात आणि त्यानुसार स्वतः लिहितात. (जसे– विनोदी कथा, शौर्यकथा)<br>• व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात. उदा., इयत्ता सातवीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी, वाक्य व वाक्यांचे प्रकार. |

# अनुक्रमणिका

भाग – १


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | आम्ही चालवू हा पुढे वारसा (गीत) | जगदीश खेबूडकर | १ |
| २. | मी चित्रकार कसा झालो! | ल. म. कडू | २ |
| ३. | प्रभात (कविता) | किशोर बळी | ६ |
| ४. | आपण सारे एक | प्रभा बैकर | ९ |
| ५. | घाटात घाट वरंधाघाट | महेश तेंडुलकर | १३ |
| ६. | आभाळाची अम्ही लेकरे (कविता) | वसंत बापट | १८ |
| ७. | नातवंडांस पत्र | नंदू नाटेकर | २० |


भाग – २


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ८. | गिर्यारोहणाचा अनुभव | रमेश महाले | २६ |
| ९. | झुळूक (कविता) | दामोदर कारे | ३२ |
| १०. | आम्ही हवे आहोत का? | शांता शेळके | ३५ |
| ११. | जीवन गाणे (कविता) | नितीन देशमुख | ४१ |
| १२. | शब्दकोश (स्थूलवाचन) | -- | ४३ |
| १३. | संतवाणी | (अ) संत सेना महाराज<br>(आ) संत चोखामेळा | ४७ |

# १. आम्ही चालवू हा पुढे वारसा

भाग – १

**जगदीश खेबूडकर** (१९३२–२०११) : प्रसिद्ध मराठी कवी, साहित्यिक, गीतकार. मराठी चित्रपटसृष्टीसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर गीतांचे लेखन केले आहे. त्यांनी लिहिलेली गीते अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांनी सुमारे ३२५ मराठी चित्रपटांसाठी गीते लिहिली आहेत. त्यांनी २५ पटकथा व संवाद, ५० लघुकथा, ५ नाटके, दूरदर्शन मालिका, टेलिफिल्म्स् यांसाठी लेखन केले आहे. 'गदिमा पुरस्कार', 'साहित्य सम्राट पुरस्कार', 'व्ही. शांताराम स्मृति पुरस्कार', 'जीवनगौरव पुरस्कार' यांसारख्या ६० हून अधिक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.


गुरूच्या शिकवणीतून सद्‌गुण अंगी बाणवून सत्कार्ये करणे, म्हणजे गुरूने दिलेला वारसा पुढे चालू ठेवणे होय. हा वारसा पुढे चालू ठेवण्याचे आश्वासन प्रस्तुत गीतातून कवी देत आहेत.

- **ऐका. वाचा. म्हणा.**



गुरुने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा

पिता–बंधु–स्नेही तुम्ही माउली
तुम्ही कल्पवृक्षातळी सावली
तुम्ही सूर्य अम्हां दिला कवडसा!



जिथे काल अंकुर बीजातले
तिथे आज वेलीवरी ही फुले
फलद्रुप हा वृक्ष व्हावा तसा!

शिकू धीरता, शूरता, वीरता
धरू थोर विद्येसवे नम्रता
मनी ध्यास हा एक लागो असा ।

जरी दुष्ट कोणी करू शासन
गुणी सज्जनांचे करू पालन
मनी मानसी हाच आहे ठसा!



तुझी त्याग–सेवा फळा ये अशी
तुझी कीर्ति राहील दाही दिशी
अगा पुण्यवंता भल्या माणसा!

P5BDE7

**शिक्षकांसाठी :** प्रस्तुत गीत विद्यार्थ्यांकडून तालासुरांत म्हणवून घ्यावे. तसेच इतर गीतांच्या ध्वनिफिती ऐकवाव्यात.

# २. मी चित्रकार कसा झालो!

**ल. म. कडू :** प्रसिद्ध मराठी लेखक व चित्रकार. त्यांची बालसाहित्याची सुमारे ३० पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांची 'झाड' हे लहान मुलांसाठी असलेले द्विभाषिक पुस्तक; 'खारीचा वाटा' हा कथासंग्रह; 'जॉर्ज कार्व्हर' हे चरित्र, 'रावीचा मोर' हे बालसाहित्य इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांना २०१७ साली 'खारीचा वाटा' या पुस्तकासाठी 'साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार' व २०१४ साली महाराष्ट्र शासनातर्फे उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा 'सानेगुरुजी पुरस्कार' मिळालेला आहे. शेवगाव, अहमदनगर येथे जानेवारी २०१८ मध्ये झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले.

निसर्गाच्या सान्निध्यात आपल्याला आपल्यातील उपजत कला शोधण्याचे अनेक मार्ग सापडतात, हे लेखकाने स्वानुभवातून या पाठात सांगितले आहे.

मी तुमच्याएवढा असताना जे अनुभवलं, पाहिलं ते तुम्हांला सांगणार आहे.

प्रथम निसर्ग. आपण निसर्गाला कधीही विसरून चालणार नाही. त्याच्या विरोधात न जाता मर्जीत राहणं केव्हाही आपल्या फायद्याचं आहे. निसर्गातून आपलं पालनपोषण होतं आणि निसर्गच आपल्याला नाना कला शिकवतो. निसर्ग धुंडाळत रहा, तुम्हांला सर्जनाच्या वाटा आपसूक सापडतील.

आता तुम्हांला माझीच गोष्ट सांगतो. माझं प्राथमिक शिक्षण एका लहानशा खेड्यात झालं. माझं खेडं अतिशय निसर्गरम्य आणि सुसंस्कृत होतं. घनदाट जंगलं. दुथडी भरून वाहणारी नदी. निळे डोंगर, हिरवी रानं. अवघा आनंदी आनंद! अशा वातावरणात माणसातली सर्जनशीलता उफाळून आली नाही तर नवलच! माझा एक मित्र होता. आम्हांला खूप वाटायचं, की आपण चित्रं काढावीत; पण काय करणार? आमच्याकडे कसलीच साधनं नव्हती. पेन्सिल, रंग, ब्रश हे तर सोडाच, साधा कागदही नव्हता. अभ्यासाची एकच वही. पाटीवर लिहिण्याची एक पेन्सिल. तिचे तुकडे झाले, तरी सांभाळून वापरावी लागायची. दुसरी मिळण्याची शक्यता नव्हती. शिवाय सगळ्यात मोठी अडचण किंवा धाक असा होता, की चित्रंबित्रं काढलेली ना मास्तरांना आवडायची ना घरातल्यांना. वात्रटपणा वाटायचा.

वैशाख महिन्यातलं ऊन करपवून टाकणारं असायचं. आम्ही गावातली सगळी मुलं नदीच्या डोहात जाऊन पडायचो. अंगात गारवा भरला, की पुन्हा काठावर येऊन बसायचं. काठालगत खूप खडक होते. पाण्याच्या प्रवाहामुळं गुळगुळीत, सपाट झालेले, लांबरूंद पसरलेले. आम्हांला तिथंच आमचा 'कॅनव्हास' सापडला. या भल्या थोरल्या खडकावर मनसोक्त चित्रं काढता येणार होती; पण कशानं काढणार? तोही मार्ग सापडला. आमच्या त्या भागात तांबूस रंगाचा मुरूम असतो. शिवाय पिवळट रंगाचे दगडही सापडतात. ते दगड आपटले, की त्याची पिवळी पिवळी फक्की पडते. अगदी पिठासारखी असते. हवं तसं पाणी घातलं, की पिवळा रंग तयार! मुरुमाचा खडा ओला करून घेतला आणि खडकावर चित्रं रेखाटणं सुरू झालं. काय काढू आणि काय नको असं व्हायचं. गुडघ्यावर टेकून रेष काढण्यात दंग व्हायचो. रेषा काढीत हातभर पुढं सरकल्यावर मागे वळून पाहावं, तर रेषा वाळून लालजर्द झालेल्या असायच्या. आणखी सुरसुरी यायची. तापलेल्या खडकावर टेकून टेकून गुडघ्याची सालटं गेलेली लक्षातच यायची नाहीत. मग उभ्या खडकावर चित्रं काढणं सुरू झालं. काही दिवसांनी वाटायला लागलं, की यात रंग भरावेत; पण ते कुठून आणणार? त्या दिवसांत काटेसावर फुलते, लालभडक होते. तिच्या फुलातले पराग पाण्यात चुरगाळले, की जांभळा रंग मिळतो. शेंदरी नावाच्या वनस्पतीच्या बोंडातल्या बिया भगवा रंग देतात. काही पानांचा हिरवा केला. चुन्याचा पांढरा, कुंकवाचा लाल आणि दगडाचा पिवळा होताच. बांबूची कोवळी काडी घेऊन पुढचं टोक ठेचलं, की त्याचा ब्रश व्हायचा. तहानभूक हरपून आम्ही दगडावरची चित्रं रंगवत बसायचो, नजर जाईल तिथपर्यंत चित्रंच चित्रं. थोड्या दिवसांनी पाऊस यायचा. नदी वाहायला लागायची. आमची चित्रं नदीच्या पोटात गडप व्हायची.

मी जे काही व्यक्तिगत सांगतो आहे, ते एक उदाहरण आहे. निसर्ग किती परीनं आपल्याला देत असतो; ते लक्षात येईल. मला इतकंच म्हणायचं आहे, की साधनं नाहीत म्हणून अडून बसण्याचं कारण नाही. तुमच्या इच्छा तीव्र असतील तर साधनांशिवाय साधना करता येते.

आता हेच पहा, श्रावण सरता सरता पाऊस कमी व्हायचा; पण नदी वाहतच असायची. आमचा 'कॅनव्हास' म्हणजे खडक मोकळा व्हायला पार चैत्र महिना उजाडायचा. तोवर काय करायचं? त्यातूनच आम्हांला मातीचा नाद लागला. लालभडक, मऊशार माती हाताला लोण्यासारखी वाटायची. मूर्ती कराव्यात असं ठरलं; पण हा मातीचा खेळही लपून छपून करावा लागे. कधी गोठ्याच्या मागच्या बाजूला नाहीतर गावातील मंदिराजवळच्या बकुळीच्या झाडाखाली आमचा उद्योग चालायचा. मूर्ती करून वाळत ठेवल्या, की काही काळानं त्यांना तडे जाऊन ढासळायच्या. हिरमोड व्हायचा. त्यावर काहीतरी उपाय शोधायलाच हवा होता. विचार करता करता लक्षात आलं, की गाईचं शेण ओलं असताना जसं असतं तसंच ते वाळल्यावरही राहतं. त्याला तडे जात नाहीत. आम्ही शेण मातीत मळून घेतलं. आता मूर्ती थोड्या टिकायला लागल्या. तरीही जास्त दिवस झाल्यावर बारीक बारीक तडे जाऊन ढलप्या पडायच्या. पुन्हा विचार सुरू...

आमच्या गावात आठवडे बाजार भरायचा. म्हादू आयते कपडे विकायला यायचा. सगळा डोंगर भाग. फक्त पायवाटा. तो आपला माल घोड्यावर लादून आणायचा. नांद्रुकीच्या झाडाची दाट सावली पडायची. तो झाडाच्या मुळीला घोडा बांधून ठेवायचा. आम्हांला घोड्याची लीद दिसली. लीद म्हणजे घोड्याचं शेण. त्यात बरेच धागेधागे दिसत होते. हे धागे माती धरून ठेवतील, असा विचार करून आम्ही तो प्रयोग केला. आता आमच्या मूर्तींना बिलकुल तडे जात नव्हते. 'केवढा आनंद झाला' हे मला शब्दांत सांगता येणार नाही. मी माध्यमिक शाळेत असताना आर्किमीडिज या शास्त्रज्ञाचा धडा वाचला. त्याला हवं होतं ते तत्त्व शोधण्यासाठी तो साध्या वाटणाऱ्या गोष्टीतही ते शोधत राहायचा. ते सापडल्यावर तो न्हाणीघरातून 'युरेका युरेका' करत धावत सुटला. तेव्हा माझ्या लक्षात आलं, की आपल्यालाही तेवढाच आनंद झाला होता जेव्हा मूर्तींना तडे जाण्याचं थांबलं होतं. आपल्यापुरता का होईना; पण तो एक शोध होता.

मुलांनो, मी तुम्हांला एवढंच सांगीन, की तुमच्या प्रत्येकात आर्किमीडिज दडलेला आहे. त्याला कायम जागता ठेवा. तुमचं आभाळ कायम आनंदानं भरलेलं राहील.

**शब्दार्थ : आपसूक** – आपोआप. **दुथडी भरून वाहणे** – ओसंडून वाहणे. **तहानभूक हरपणे** – कामात मग्न होणे. **गडप** –गायब. **हिरमोड होणे** – नाराज होणे. **नांद्रुक** – पिंपरण आणि पिंपळवर्गीय झाड.



## स्वाध्याय

**प्र. १. उत्तर लिहा.**

लेखकाने पाठात कलेसंबंधी वर्णिलेले दोन विषय

(१) .............. (२) ..............

**प्र. २. काय ते सांगा.**

(अ) मूर्तीला तडे जाऊ नये यासाठी लेखकाला सापडलेला उपाय.

(आ) लेखकाचा कॅनव्हास.

**प्र. ३. आकृती पूर्ण करा.**

(अ) **लेखकाने त्यांच्या खेड्याचे सांगितलेले विशेष**

(आ) **लेखकाच्या खेड्याचे सौंदर्य वाढवणारे घटक**

**प्र. ४. योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) पिवळा | (अ) झाडांच्या पानापासून. |
| (२) जांभळा | (आ) दगडांपासून. |
| (३) भगवा | (इ) काटेसावरीच्या फुलातील परागकणांपासून. |
| (४) हिरवा | (ई) शेंदरी झाडाच्या बियांपासून. |

**प्र. ५. एका शब्दांत उत्तर लिहा.**

(अ) बांबूच्या कोवळ्या काडीपासून तयार व्हायचा–

(आ) चित्र काढण्यासाठी वापरला जाणारा कागद–

(इ) लालभडक मातीपासून तयार केल्या जायच्या–

(ई) ओल असताना जसे असते तसेच वाळल्यावरही असते–

(उ) घोड्याच्या शेणाला म्हणतात–

**प्र. ६. 'तुमच्या इच्छा तीव्र असतील तर साधनांशिवाय साधना करता येते' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

## खेळूया शब्दांशी.

- **खाली दिलेल्या शब्दांतून नाम व विशेषणे ओळखून त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

हिरवी, सावली, डोंगर, राने, निळे, दाट

## शोध घेऊया.



- **विविध झाडांपासून रंग तयार केले जातात त्याची आंतरजालाच्या मदतीने माहिती मिळवा.**



## चर्चा करूया.

- **प्रत्येकाच्या अंगी काही ना काही कला असते. तुमच्या मित्र-मैत्रिणींसमवेत त्यांना आवडणाऱ्या गोष्टींविषयी (कला) चर्चा करा. ती गोष्ट त्यांना करायला का आवडते? यामागील कारणे समजून घ्या.**

**उपक्रम :** तुमच्या परिसराचे निरीक्षण करा. परिसरातील विविध घटकांपासून तुम्हांला काय काय शिकायला मिळते, त्याची नोंद करा.

## आपण समजून घेऊया.

- **वाक्य म्हणजे काय?**

संपूर्ण अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दसमूहाला **वाक्य** म्हणतात. वाक्याचे दोन भाग असतात. ज्याच्याविषयी सांगायचे ते **उद्देश्य** आणि जे सांगायचे ते म्हणजे **विधेय**.

'त्याचा मोठा मुलगा दररोज आगगाडीने मुंबईला जातो.'

या वाक्यात मुलाविषयी सांगायचे आहे, म्हणून 'मुलगा' हे उद्देश्य, तर 'जातो' हे विधेय आहे. या वाक्यातील 'त्याचा', 'मोठा' हे शब्द उद्देश्याचा विस्तार आहेत, तर 'दररोज', 'आगगाडीने' हे शब्द विधेयाचा विस्तार आहेत.

- **वाक्यांचे विविध प्रकार आहेत. त्यातील काही वाक्य प्रकारांची माहिती आपण करून घेणार आहोत.**

**(१) विधानार्थी वाक्य**

ही वाक्ये वाचा.

(अ) माझे घर दवाखान्याजवळ आहे.

(आ) तो रोज व्यायाम करत नाही.

या प्रकारच्या वाक्यांत केवळ विधान केलेले असते.

**(२) प्रश्नार्थी वाक्य**

ही वाक्ये वाचा.

(अ) तुला लाडू आवडतो का?

(आ) तुम्ही सकाळी कधी उठता?

या प्रकारच्या वाक्यांत प्रश्न विचारलेला असतो.

**(३) उद्‌गारार्थी वाक्य**

ही वाक्ये वाचा.

(अ) अरेरे ! फार वाईट झाले.

(आ) शाबास ! चांगले काम केलेस.

या प्रकारच्या वाक्यांत भावनेचा उद्‌गार काढलेला असतो.

**(४) आज्ञार्थी वाक्य**

ही वाक्ये वाचा.

(अ) मुलांनो, रांगेत चला.

(आ) उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा.

या प्रकारच्या वाक्यांत आज्ञा किंवा आदेश असतो.

- **वर दिलेल्या चारही प्रकारांतील वाक्यांचे नमुने तयार करा.**

P5K9FU

# ३. प्रभात

**किशोर बळी** (१९८१) : प्रसिद्ध कवी. त्यांचे 'पाकळ्या' हा चारोळी संग्रह; 'पहाटेच्या प्रतिक्षेत', 'अक्षरांचे सूर' हे काव्यसंग्रह; 'धुम्मस' हे वऱ्हाडी स्तंभलेखन इत्यादी लेखन प्रसिद्ध आहे. अनेक चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केले आहे. काही मालिका आणि चित्रपट यांतून अभिनय केला आहे. त्यांचे 'हास्यबळी डॉट कॉम' या प्रबोधनपर एकपात्री कार्यक्रमाचे राज्यभरात सुमारे ३०० प्रयोग झालेले आहेत. त्यांना 'तुका म्हणे' काव्यपुरस्कार, स्वर्गीय यशवंतराव दाते संस्थेचा 'विनोदी लेखन पुरस्कार', राष्ट्र सेवा दलाचा 'समाज शिक्षक पुरस्कार' अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

विज्ञान, तंत्रज्ञानाच्या नव्या युगात ज्ञानाची नवनवी दालने खुली होत आहेत. नव्या पिढीला कलागुणांच्या विकासाच्या नव्या संधी मिळत आहेत. अशा आश्वासक वातावरणात भेदभाव विसरून देशाला प्रगतीपथावर नेण्याच्या नव्या वाटा शोधण्याचे आवाहन कवी या कवितेतून करत आहे. प्रस्तुत कविता 'किशोर', फेब्रुवारी २०१७ या मासिकातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात
कला-गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

भव्य पटांगण, बाग मनोहर
फुला-पाखरांचे जग सुंदर
आपुलकीचा सुवास पसरे
मनामनांतून इथे निरंतर.
गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

पायाभरणी अस्तित्वाची
प्रयोगशाळा व्यक्तित्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई
इथे रुजवणूक त्या तत्त्वांची
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

नवीन स्वप्ने, नवीन आशा
ही प्रगतीची नवपरिभाषा,
परिश्रमाने, अभ्यासाने
उन्नत बनवू आपुल्या देशा.
मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.



**शब्दार्थ : क्षितिज** – आकाश पृथ्वीला टेकलेले आहे असे दिसणारी भासमान रेषा. **मनोहर** – सुंदर. **निरंतर** – सतत. **प्रयोगशाळा व्यक्तित्वाची** – व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचे ठिकाण. **नवपरिभाषा** – नवीन व्याख्या. **उन्नत** – विकसित.



## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवीने वर्णिलेली प्रतिभेची प्रभात कुठे होणार आहे?

(आ) कवीच्या मते व्यक्तित्वाच्या प्रयोगशाळेत कोणते गुण रुजतील?

(इ) प्रगतीची नवपरिभाषा कोणती?

**प्र. २. गोलातील शब्दाचा आधार घेऊन चौकटी पूर्ण करा.**

(अ) सुंदर जग → (कोणाचे) [ ]

(आ) पसरणारा सुवास → (कशाचा) [ ]

(इ) अमूल्य शिकवण → (कोणाची) [ ]

(ई) पायाभरणी → (कशाची) [ ]

**प्र. ३. कवितेच्या आधारे योग्य पर्याय निवडा.**

(अ) कलागुणांच्या क्षितिजावर प्रतिभेची पहाट उगवली, कारण

(१) सूर्योदय होऊन सकाळ झाली.

(२) नवे युग उजाडले.

(३) ज्ञानाचे तेज नव्या युगाच्या नभात पसरले.

(४) पक्ष्यांचा चिवचिवाट सुरू झाला.

(आ) कवीच्या मते 'मानवतेचे युग' म्हणजे–

(१) मानवांचे युग.

(२) नव्या विचारांचे युग.

(३) माणसाच्या प्रगतीचे युग.

(४) भेदाभेद नसलेले युग.

**प्र. ४. योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) नव्या युगाच्या नभात | (अ) व्यक्तित्वाची जडणघडण |
| (२) प्रतिभेची प्रभात | (आ) स्वत:चे अस्तित्व मजबूत करणे. |
| (३) पायाभरणी अस्तित्वाची | (इ) नवनिर्मितीची पहाट |
| (४) व्यक्तित्वाची प्रयोगशाळा | (ई) नव्या विचारांच्या क्षेत्रात |

**प्र. ५. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) 'तन सुदृढ' आणि 'मन विशाल' या शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

(आ) तुम्हांला कळलेली कवीची प्रगतीची नवपरिभाषा स्पष्ट करा.

(इ) 'मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात' या ओळीचा तुम्हांला कळलेला सरळ अर्थ लिहा.

**प्र. ६. कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.**

(अ) नभात-

(आ) मनोहर-

(इ) अस्तित्वाची-

(ई) युगात-

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांसाठी कवितेतील शब्द शोधा.**

(अ) आकाश- [ ]

(आ) सुगंध- [ ]

(इ) सुंदर- [ ]

(ई) शरीर- [ ]

**(आ) विशेष्य विशेषणाच्या योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) भव्य | (अ) मन |
| (२) अमूल्य | (आ) युग |
| (३) नवे | (इ) शिकवण |
| (४) सुंदर | (ई) पटांगण |
| (५) विशाल | (उ) जग |

**उपक्रम :** 'सुदृढ शरीर' बनवण्यासाठी खालील मुद्द्यांना अनुसरून माहिती मिळवा व वर्गात त्याचे वाचन करा.

(१) व्यायाम

(२) सवयी

(३) आहार

P5U5HH

# ४. आपण सारे एक

**प्रभा बैकर** (१९४८) : प्रसिद्ध लेखिका. त्यांची 'प्राजक्त पाकळ्या', 'तिची गोष्ट' हे लघुकथासंग्रह; 'मनोगत', 'दवबिंदू झगमगणारे' हे ललितलेख संग्रह; 'बाई मी (विसर) भोळी' हा विनोदी लेखसंग्रह; 'आनंदमेळा' हा बालगीतसंग्रह इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत.

शरीररूपी राज्यातील सर्वच इंद्रिये परस्परांना अनुकूल व महत्त्वाची असतात. सर्वांनी एकोप्याने राहून परस्परांची काळजी घेतली तर आरोग्य उत्तम राहते, हे या नाटिकेतून सहज सोप्या शब्दांतून लेखिकेने पटवून दिले आहे. पर्यायाने कुटुंब, परिसर, देश यांच्यासाठीही प्रातिनिधिक स्वरूपातील हा पाठ एकात्मतेचा संदेश देतो. प्रस्तुत पाठ 'सप्तरंगी नाटिका' या पुस्तकातून घेतला आहे.

**शामराव** : या! या!! रामराव, आज स्वारी कशी आली इकडे? नाशिक सोडून बरे जळगावला आलात? काम तरी काय काढलय्? की सहज फेरी?

**रामराव** : अरे, अरे, एका दमात किती प्रश्न विचारता शामराव? सध्या फिरस्तीची ड्युटी आहे ना! काय करणार बाबा, या पोटासाठी फिरावं लागतं.

**शामराव** : असं असं, चला तर मग आपण घरी जाऊन पोटोबाची पूजा करू.

**रामराव** : चला, चला, कामाचं बघू नंतर. आधी पोटोबा, मग विठोबा.

(दोघेही जातात. नासिका (नाक), कर्णिका (कान), नयनकुमार (डोळे), जिव्हाताई (जीभ), हस्तकराज (हात), पदकुमार (पाय) इत्यादी अवयवांचा गमतीदार संवाद सुरू होतो.)

**कर्णिका** : काय गं जिव्हाताई, नेहमी तू बडबडत असतेस नि आज गप्प गप्प का? एवढी उदास कां बरे झाली आहेस?

**जिव्हाताई** : काय सांगू बाई! मला या पोटोबा खवय्येची मोठी चीड यायला लागलीय.

**कर्णिका** : अन् ती ग कां?

**जिव्हाताई** : कां म्हणून काय विचारतेस, आत्ता मघाशी रामराव-शामरावांचं बोलणं ऐकलंस ना तू? पोटासाठी वणवण हिंडावं लागतं त्यांना. कोणाही माणसाला विचारा, सारी धडपड कशासाठी तर पोटासाठी! आणि त्या पोटोबामुळे आपलीही फरफट होते.



शिवाय मानसन्मान तो सगळा त्याला. परवा तर त्याचं-माझं भांडणच झालं.

**कर्णिका :** कशावरून गं?

**जिव्हाताई :** अगं. दरवेळी आपला तो म्हणेल तेवढंच खायची सक्ती असते माझ्यावर! एखादवेळी मला आवडलेला पदार्थ मी जर जास्त खाल्ला, की झालं याचं गुरगुरणं सुरू! वैताग नुसता.

**कर्णिका :** खरंच गंऽ बाई. शिवाय हे पोटोबा महाशय नुसतंच बसून खातात. आपल्यासारखं काही काम करत नाही की काही नाही. ही आलीच बघ नासिका. काय ग नासिके, तुला काय वाटतं?

**नासिका :** कशाबद्दल?

**कर्णिका :** अगं ही बडबडी, पोटोबाबद्दल तक्रार करतीय. तिचं म्हणणं आहे, की पोटोबा खवय्ये काहीच काम करत नाहीत.

**नासिका :** मग त्यात खोटं ते काय? माझंच बघ ना, रात्रंदिवस श्वास घेण्याचं माझं कार्य सतत चालूच असतं. वास घेण्याचंही जादा काम मी करते; पण हे पोटोबा मात्र...

**हस्तकराज :** काहीच काम करत नाहीत.

**पदकुमार :** उलट सगळ्यांवर गुरगुरतो. शिवाय जो उठतो तो, 'कशासाठी? पोटासाठी', म्हणत आम्हांला राबवून घेतो.

**नयनकुमार :** मीसुद्धा हेच म्हणतोय. मी नेहमी बघण्याचं काम करतो. झालंच तर माणसाच्या सौंदर्यात भर घालतो, तो मीच. मी नसतो तर...

**कर्णिका :** पुरे तुझं लेक्चर. मीसुद्धा ऐकण्याचं काम करून माणसाच्या जीवनव्यवहाराला मदत करते म्हटलं, माझ्याशिवाय तर...

**नासिका :** म्हटलं कर्णिके, तुझ्यापेक्षाही माझा उपयोग जास्त महत्त्वाचा आहे बरं का. श्वास घेतल्याशिवाय माणूस जगू शकेल का?

**जिव्हाताई :** आणि माझ्यामुळेच तर माणसांच्या जीवनात अर्थ आहे. मी गोड बोलते. नाना तऱ्हेच्या पदार्थांची चव माझ्यामुळेच मानव चाखू शकतो. आपण सारेजण अनेक कामे करतो; पण हे पोटोबा मात्र आयते बसून खातात. तेव्हा आपण या पोटोबांविरूद्ध संप करूया आणि मेंदूराजेसाहेबांकडे तक्रार करूया.

**नयनकुमार :** हो, हो, आमची तयारी आहे संप करण्याची. आजपासून मी बघणार नाही.

**नासिका :** मी वास घेणार नाही. श्वास मात्र मला घ्यावाच लागेल.

**कर्णिका :** मी ऐकणार नाही.

**जिव्हाताई :** मी अजिबात खाणार नाही आणि दंतराजांनासुद्धा संपात सामील करून घेईन.

**हस्तकराज :** मी घास उचलणार नाही.

**पदकुमार :** मी स्वयंपाकघरापर्यंत जाणार नाही, म्हणजे मग त्या पोटोबाला चांगलीच अद्दल घडेल.

**(सर्वजण मेंदूराजे यांच्याकडे जातात. त्यानंतर मेंदूराजे तातडीने सभा घेतात.)**

**सर्वजण :** मेंदूराजेसाहेबांचा जयजयकार असो!

**मेंदूराजे :** बसा मंडळी. पोटोबा प्रधान आले, की नाही अजून!

**पोटोबा :** मी केव्हाच हजर आहे महाराज.

**मेंदूराजे :** पोटोबा, या सर्व मंडळींची तुमच्याबद्दल तक्रार आहे, की तुम्ही अजिबात काम करत नाही. नुसतं खाता आणि दुसऱ्यांवर गुरगुरता.

**पोटोबा :** महाराज बोलताना जरा बेअदबी होतेय, कसूर माफ असावी; पण मी काम करत नाही हे म्हणणं साफ खोटं आहे. हो, अधूनमधून मी गुरगुरतो; पण ते यांच्यावर नव्हे. ती माझी सवय आहे.

त्याशिवाय शरीराचं राज्य सुरळीत कसं चालणार? आता हेच उदाहरण घ्या ना. या सर्वांनी संप पुकारला. मी गप्प बसलो; पण याचा परिणाम त्यांनाचा भोगावा लागला. जीवनरस मिळाला नाही म्हणून त्यांचे चेहरे बघा कसे सुकून गेलेत.

**मेंदूराजे :** नयनकुमार, पटलं ना सर्वांना! शिवाय असं पहा, आपण सारेच एकमेकांवर अवलंबून आहोत. आपल्या देशाचं राज्य सुरळीत कसं चालणार? आपल्या देशाचं राज्य चालतं ते सर्वांच्या एकतेमुळे. पाय चालतात ते रस्ता डोळ्यांनी दिसतो म्हणून. सर्वांची कामे होतात ती पोटोबामुळे. आपणाला जीवनरस मिळतो म्हणून. त्याने अन्न खाल्ले नाही तर काय हाल होतात ते आता तुम्हांला समजले असेलच. आपण सारेच या शरीररूपी राज्याचे सेवक आहोत. आपले हे राज्य सुरक्षित राहण्यासाठी आपण सर्वांनी एक व्हायलाच हवे. खरे ना?

**सर्वजण :** होय महाराज, पोटोबा, आम्हांला क्षमा करा. आता पुन्हा नाही आम्ही तुमच्याविषयी कुरकुर करणार. आपण सारेच या राज्याचे सेवक. आपण सारे एक! आपण सारे एक!!

**शब्दार्थ : फिरस्ती** – फिरणे. **पोटोबाची पूजा करणे** – जेवणे, खाणे. **पोटासाठी वणवण हिंडणे** – अन्न मिळवण्यासाठी कष्ट करणे. **फरफट होणे** – गैरसोय होणे. **बेअदबी** – अवमान. **कसूर** – गुन्हा. **कुरकुर करणे** – तक्रार करणे.



## स्वाध्याय

**प्र. १. एका शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) माणसाच्या सौंदर्यात भर घालणारे [ ]

(आ) माणसाच्या जीवनव्यवहारात मदत करणारी [ ]

(इ) वास घेण्याचे जास्तीचे काम करणारी [ ]

(ई) जिव्हाताई यांना संपात सामील करून घेणारे [ ]

(उ) सर्वांनी ज्यांच्याकडे तक्रार केली ते [ ]

(ऊ) अजिबात काम न करण्याचा आरोप असणारे [ ]

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

(अ) **जिव्हाताईची कामे** → [ ] [ ]

(आ) **पदकुमार आणि हस्तराजांचा निश्चय** → [ ] [ ]

(इ) **जिव्हाताईची तक्रार** → [ ] [ ]

**प्र. ३. कारणे शोधा व लिहा.**

(अ) जिव्हाताई गप्प आहे, कारण.........

(आ) पोटोबा अधूनमधून गुरगुरतो, कारण.........

**प्र. ४. स्वमत स्पष्ट करा.**

(अ) 'आपण सगळे शरीररूपी राज्याचे सेवक आहोत' या विधानाबाबत तुमचे मत.

(आ) पोटोबाबद्दलची तक्रार सांगून सर्व इंद्रियांनी ती तक्रार करण्याची कारणे.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे घाला.**

(अ) तो म्हणेल तेवढच खायच सक्ती असते माझ्यावर

(आ) हो हो आमची तयारी आहे

**(आ) वर्गीकरण करून तक्ता पूर्ण करा.**

भरभर, सावकाश, पोटोबाविरुद्ध,
बापरे, आणि, सतत, किंवा, कशासाठी,
पोटोबामुळे, स्वयंपाकघरापर्यंत,
तुमच्याबद्दल, अथवा, अबब

| क्रियाविशेषण अव्यय | शब्दयोगी अव्यय | उभयान्वयी अव्यय | केवलप्रयोगी अव्यय |
|---|---|---|---|
| | | | |

**(इ) खालील शब्दांसाठी पाठात वापरलेले शब्द लिहा.**

(अ) कान– ☐ (आ) नाक– ☐ (इ) हात– ☐

(ई) पाय– ☐ (उ) जीभ– ☐

**उपक्रम :**

(१) 'आधी पोटोबा मग विठोबा'ही म्हण या पाठात आली आहे. याप्रमाणे शरीर अवयवांशी संबंधित असणाऱ्या इतर म्हणी शोधा व लिहा.

(२) या पाठाचे नाट्यीकरण वर्गात सादर करा.

P641J5

# ५. घाटात घाट वरंधाघाट

**महेश तेंडुलकर** : प्रसिद्ध लेखक. त्यांची 'बंच ट्रेकिंग', 'साद पन्हाळा ते विशाळगडची', 'साद शिवकालीन दुर्गांची', 'शिलालेखांच्या विश्वात', 'गड मंदिरावरील द्वारशिल्प', 'भटकंती कुडाळ : वेंगुर्ल्याची', 'भटकंती अनलिमिटेड', 'किल्ले जिंजी', 'किल्ल्यांच्या दंतकथा' अशी ऐतिहासिक, माहितीपर पुस्तके; 'गोव्यातील पर्यटन' हे प्रवासवर्णन इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत.

प्रस्तुत पाठात सह्याद्रीमधील वरंधाघाट, वरंधघाटाची वैशिष्ट्ये व तेथे घेतलेले अनुभव लेखकाने मांडले आहेत. हा पाठ 'भटकंती अनलिमिटेड' या पुस्तकातून घेतला आहे.



ज्येष्ठ महिना सुरू झाला, की पावसाचे वेध लागतात. सोसाट्याचा वारा आणि पहिल्या पावसाच्या सरींची वार्ता पसरवणारा मातीचा सुगंध हे अगदी प्रत्येक वर्षी येतच असतं. तरीही ते दरवेळी नवीन वाटतं. बालपणी बेफाम होऊन 'ये गं ये गं सरी, माझे मडके भरी'च्या तालावर पावसात चिंब चिंब भिजणं आणि त्याबद्दल आई-वडिलांकडून पोटभर मार खाणं. आजी-आजोबांकडून कागदी होड्या करायला शिकून त्या पावसाच्या पाण्यात सोडण्यासाठी पुन्हा पावसाची आतुरतेने वाट पाहणं. अशा कितीतरी आठवणी घेऊन दरवर्षी पाऊस येत असतो; पण मोठं झाल्यावर इंद्रधनुष्यात उमलणाऱ्या रंगांचे अर्थ उमगू लागतात. बरसण्याचा अर्थ कळू लागतो आणि हुरहूर, तळमळ अशा शब्दांचा थेट प्रत्यय येऊ लागतो. पावसाच्या आगमनाने गतकाळातले ''ते क्षण'' पुन्हा जिवंत होतात. डोळ्यांसमोर येऊ लागतात आणि कधी कधी पापण्यांमधून अलगदपणे वाहूनही जातात. मग डोळ्यांतला कोणता आणि बाहेरचा कोणता तेच कळत नाही. असं बरंच काही अनुभवायचं असेल तर वरंधा घाट गाठलाच पाहिजे.

पुण्याहून महाडकडे जाताना हिरव्या हिरव्या रंगाची झाडे पाहत पाहत, पावसाळ्यातले टिपिकल पावसाळी कुंद वातावरण एन्जॉय करत करत प्रवास सुरू असतो. तो बंदिस्त गाडीत सुक्याने करण्यात जितकी मजा असते त्याहीपेक्षा जास्त दोन चाकीवर अंग भिजवत करण्यात असते. पावसाचं पाणी अंगावर घेत आणि रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या अंगावर उडवत, बेफाम वारा छातीवर झेलत, आवडती गाणी गुणगुणतं पावसाळी प्रवास करण्यातली मजा तर काही औरच असते. असा शरीर गारठवणारा आणि मनाला उभारी देणारा प्रवास कधी संपूच नये असे वाटते; पण पाहता पाहता मैलांचे दगड मागे पडत जातात आणि आपण येऊन पोहोचतो ते वरंधा घाटात. घाटात घाट वरंधा घाट, बाकी सब घाटीयाँ! असे इथे आल्यावर वाटते. पाण्यावर झुकलेल्या हिरव्यागच्च झाडीतून रोरावत बाहेर येणारे धबधबे, दरीतलं हिरवं रान, ढगाळलेले डोंगर, पावसाची संततधार, मोठमोठ्या दगडांवर आसूड मारत धावत खळाळत वाहणारे पाणी, असे निसर्गाचे विहंगम दृश्य डोळ्यांसमोर येते अन् नजरेचे पारणे फेडून जाते. त्या पावसाळी वातावरणात भजी-वडे-चहा असा चमचमीत मेनू मजबूत चापायला वरंधा घाटातल्या टपऱ्यांसारखी दुसरी जागा नाही. श्री वाघजाईच्या सोबतीने उभारलेल्या टपऱ्यांमधून हा राजेशाही खाना अगदी ताजा ताजा तयार केला जातो. गरमागरम कांदाभजी, आलं लसूण घालून तळलेला गरमागरम बटाटेवडा आणि सोबत वाफाळलेला चहा. बाहेर बरसणाऱ्या पावसाकडे पाहत या गरमागरम मेनूचा आस्वाद घेत रानवाऱ्याचं घोंघावणं ऐकत, विजेचं

लखकन् चमकणं अन् कडाडणं मनाच्या हार्ट डिस्कवर स्टोर करत कसा वेळ जातो तेच कळत नाही. बराच वेळ गेल्यावर थोडंस भिजावसं वाटतं, पाय मोकळे करावेसे वाटतात. थोडं डेअरिंग करावंसं वाटतं. जर असं खरंच वाटत असेल, तर इथे अशा जिगरबाज भटक्यांसाठी कावळ्या किल्ला सज्ज आहे.

कावळ्या किल्ला तसा बराच मोठा आहे. तो फोडूनच वरंधा घाटाचा शेवटचा टप्पा तयार केला आहे. श्री वाघजाई मंदिराच्या बरोबर वरच्या भागात डोंगरमाथ्याजवळ नऊ टाक्यांचा समूह आहे. कोणे एके काळी तो कावळ्या किल्ल्याचा एक भाग होता. भजी-वडे-चहाच्या टपऱ्यांच्या बाजूने अवघ्या दहा-पंधरा मिनिटांतच इथं जाऊन पोहोचता येतं. पाण्याला जीवन का म्हणतात? ते इथं आल्यावर कळतं. काळ्याशार पाषाणात खोदलेली पाण्याची ती टाकी कित्येक वर्षे कित्येकांची तहान भागवत असतील कोण जाणे. ओल्या वाटेने परत जाताना अंगावरचे कपडे हमखास रंगतात, कारण पायवाटच तशी रंगिली आहे.

परत एकदा आपण डांबरी रस्त्यावर येतो. उजव्या हाताच्या वळणावर कावळ्या किल्ल्याकडे जाणाऱ्या पायवाटेवर नजर स्थिरावते. बांधीव पायऱ्या पार करून अरूंद पायवाटेने कारवीच्या झाडीतून हृदयाची धडधड वाढवणारा ट्रेक सुरू होतो. वरंधा घाटाच्या उत्तरेला पसरलेल्या डोंगराच्या सोंडेवरून जाताना, डावीकडे खाली वरंधा घाटाचा कोकणात उतरत जाणारा वळणावळणाचा रस्ता दिसतो. इथून पाय सटकला, की थेट समर्थांच्या शिवथरघळीत! तेव्हा जर कोकणात जायचं नसेल, तर देशावरच्या मातीत सावधपणे पावलं टाकत टाकत जायला हवं. डोंगरधारेच्या कड्यावरून जाणारी अरुंद पायवाट एका सपाटीवर येऊन थांबते. तशी सपाटीही अरुंदच. तिथून पुन्हा एकदा कारवीची झाडी बाजूला करत करत शेवटी एका टेकाडाची उतरण उतरून अखेरची चढाई समोर येते. इथून वरंधा घाटाचं मस्त दर्शन घडतं. डोंगराच्या सोंडेच्या शेवटी जोत्याचे अवशेष आणि ढासळून गेलेल्या बुरुजाचे अवशेष दिसतात.

कोकणातला निसर्ग पाहत काही वेळ इथेच शांत उभं राहायला हवं. निसर्गगीत अनुभवायला हवं. परतीच्या प्रवासात डोळ्यांत साठवलेले ते पावसाचे चार क्षण, अरूंद पायवाटेवरून अनुभवलेला तो थरार, कारवीच्या झाडाचे ते काडकन् मोडणं आणि त्याचा आवाज ऐकून काळजात लख्ख होणं, अन् लगेच त्यातून सावरणं हे सारं सारं काही आठवत राहतं. हसता हसता रडवणारा आणि रडत रडत हसवणारा हा ट्रेक एन्जॉय करायचा असेल तर वरंधा घाटाच्या दिशेने आपल्या गाडीची चाकं वळवायला हवी.

**शब्दार्थ :** **वेध** – लक्ष्य. **बेफाम** – सुसाट वेगाने. **पोटभर मार खाणे** – भरपूर मार खाणे. **प्रत्यय** – अनुभव. **रोरावत** – रों रों आवाज करत. **विहंगम** – विलोभनीय, सुंदर. **चापणे** – खाणे. **कारवी** – एक झाड. **अवशेष** –शिल्लक राहिलेला भाग .



## स्वाध्याय

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

**पावसाळा सुरू झाल्याच्या लेखकाला जाणवणाऱ्या खुणा**

↓ ↓

**प्र. २. पावसाच्या आगमनाचा लेखकाच्या मनावर होणाऱ्या परिणामांचा ओघतक्ता तयार करा.**

पावसाच्या आगमनाने गतकाळातले क्षण जिवंत होतात.

↓

पाण्यातून अलगदपणे वाहून जातात.

↓

**प्र. ३. खालील शब्दसमूहांचा अर्थ स्पष्ट करा.**

(अ) जिगरबाज भटके-

(आ) रंगिली पायवाट-

(इ) डोंगराची सोंड-

**प्र. ४. तुमच्या शब्दांत माहिती लिहा.**

(अ) वरंधा घाटातील निसर्गाचे विहंगम दृश्य तुमच्या शब्दांत वर्णन करा.

(आ) कावळ्या किल्ला.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खाली दिलेल्या विशेष्य आणि विशेषणांच्या योग्य जोड्या लावा.**

| विशेषण | विशेष्य |
|---|---|
| विहंगम | वारा |
| गरमागरम | पाषाण |
| घोंघावणारा | पायवाट |
| काळाशार | दृश्य |
| अरुंद | कांदाभजी |

**(आ) खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा.**

(अ) पुण्याहून महाडकडे जाणाऱ्या रस्त्यावर हिरवी झाडी आहे.

(आ) चमचमीत मेनू मजबूत चापायला वरंधा घाटातल्या टपऱ्यांसारखी दुसरी जागा नाही.

(इ) जिगरबाज भटक्यांसाठी कावळ्या किल्ला सज्ज आहे.

**(इ) खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा.**

(अ) घाटात घाट वरंधा घाट बाकी सब घाटियाँ!

(आ) गतकाळातले 'ते क्षण' पुन्हा जिवंत होतात.



## चर्चा करूया.

- वरंधा घाटातील टपऱ्यांमधील चमचमीत मेनूंबाबत चर्चा करून एक सुंदर मेनूकार्ड तयार करा. त्याबाबत मित्रमैत्रिणींशी चर्चा करा.

## शोध घेऊया.



- आंतरजालाच्या साहाय्याने महाराष्ट्रातील वेगवेगळे घाट व त्यांविषयीची माहिती मिळवा व त्यांची नोंद ठेवा.

## आपण समजून घेऊया.

### (५) केवलवाक्य

(अ) ती रोज सकाळी लवकर उठते.

(आ) तो कसोटी सामन्यात खेळतो का?

ही **केवलवाक्ये** आहेत. केवलवाक्यात एकच विधान असते, त्यामुळे एक उद्देश्य व एकच विधेय असते. केवलवाक्य हे विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी किंवा नकारार्थी यांतील कोणत्याही प्रकारचे असू शकते.

### (६) मिश्रवाक्य

(अ) जेव्हा मनात येईल, तेव्हा मी गावाला जाईन.

(आ) पावसाळा आला, की आकाशात काळे ढग जमतात व पाऊस पडू लागतो.

ही **मिश्रवाक्ये** आहेत. मिश्र वाक्यांत दोन किंवा अधिक वाक्ये असतात, जी एकमेकांवर अवलंबून असतात. अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असणारे वाक्य 'मुख्य वाक्य' असते, तर मुख्य वाक्यावर अवलंबून असणारे वाक्य गौणवाक्य असते.

उदा., वरील वाक्यांत 'मी गावाला जाईन' व 'पावसाळा आला' ही दोन मुख्य वाक्ये आहेत.

कधीकधी एका मुख्य वाक्यावर एक किंवा अधिक गौणवाक्ये अवलंबून असतात. ही गौणवाक्ये उभयान्वयी अव्ययाने एकमेकांना जोडलेली असतात.

### (७) संयुक्तवाक्य–

(अ) मंदा रोज सकाळी गणिताचा अभ्यास करते आणि संध्याकाळी मराठीचा अभ्यास करते.

(आ) मिहिर 'खो खो'त भाग घेईल किंवा लंगडी खेळेल.

ही **संयुक्तवाक्ये** आहेत. संयुक्तवाक्यात दोन वाक्ये असतात. ती दोन वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात; पण ती स्वतंत्र असतात, म्हणजे ती दोन केवलवाक्ये असतात. अर्थाच्या दृष्टीने ती एकमेकांवर अवलंबून नसतात. ते एक जोडवाक्य असते.

## बातमी लेखन

दैनंदिन व्यवहारात घडणाऱ्या घटनांच्या बातम्या आपण वृत्तपत्रे, टी. व्ही., रेडिओ यांसारख्या माध्यमांतून वाचत व ऐकत असतो. त्यामुळे घडून गेलेल्या, घडत असलेल्या आणि घडणाऱ्या विविध घटनांविषयी आपणाला सविस्तर माहिती बातमीच्या माध्यमातून मिळत असते.

- **बातमी लेखनासाठी आवश्यक गुण–**

  (१) लेखन कौशल्य. (२) भाषेचे उत्तम ज्ञान. (३) व्याकरणाची जाण. (४) सोपी, सुटसुटीत वाक्यरचना. (५) चौफेर वाचन.

**बातमीची विविध क्षेत्रे :** सांस्कृतिक, क्रीडा, कृषी, शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक, दैनंदिन घटना.

- **खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, उत्रौली या शाळेत कला शिबिराचा समारोप संपन्न.**

**दिनांक : २० डिसेंबर** *लोकप्रतिभा*

### *चित्रकला शिबिराचा समारोप*

उत्रौली (ता. भोर) : उत्रौली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दहा दिवसांचे चित्रकला शिबिर नुकतेच संपन्न झाले. १९ डिसेंबर रोजी दुपारी ४.०० ते ६.०० या वेळात शिबिराचा समारोप समारंभ साजरा झाला. या शिबिराची सांगता प्रसिद्ध चित्रकार श्री. अविनाश शिवतरे यांच्या सप्रात्यक्षिक मनोगताने करण्यात आली.

आपल्या जीवनातील कलेचे महत्त्व सांगताना प्रत्येकाने कोणती–ना–कोणती कला शिकणे आवश्यक आहे, हा विचार त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. समारंभाचे अध्यक्षस्थान प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. सदाशिव शिंदे यांनी भूषवले. कलाशिक्षिका श्रीमती सुनीता सोमण यांनी प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे आभार मानले.

या निमित्ताने सर्व पंचवीस शिबिरार्थींच्या चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

**(१) कोण ते लिहा.**

(अ) समारंभाचे प्रमुख पाहुणे– (आ) समारंभाचे अध्यक्ष–

(इ) चित्रकला प्रदर्शनास प्रतिसाद देणारे–

**(२) उत्तर लिहा.**


(अ) शिबिरार्थींची संख्या–

(आ) शिबिरार्थींनी शिबिरात शिकलेली कला–

(इ) शिबिराचे ठिकाण–

(ई) शिबिर सुरू झाले ती तारीख–

**(३) वरील बातमीमध्ये ज्या ज्या गोष्टींविषयी माहिती दिलेली आहे ते घटक लिहा.**




P6CHKS

# ६. आभाळाची अम्ही लेकरे

**वसंत बापट** (१९२२-२००२) : प्रसिद्ध कवी. त्यांची 'अकरावी दिशा', 'सकीना', 'प्रवासाच्या कविता', 'शिंग फुंकिले रणी', 'मानसी', 'शूर मर्दाचा पोवाडा', 'मेघहृदय', 'तेजसी', 'राजसी' हे काव्यसंग्रह; 'चंगामंगा', 'अबडकतबडक', 'आम्ही', 'बालगोविंद' हे बालवाङ्मय; 'बारा गावचं पाणी' हे प्रवासवर्णन इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत.

सर्व माणसे निसर्गाची लेकरे आहेत. या कष्टकऱ्यांमध्ये माणुसकीचे नाते अभंग असल्यामुळे त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसतो. प्रस्तुत कवितेतून कवीने हा मानवतावादी व उदात्त विचार व संदेश दिला आहे. प्रस्तुत कविता 'शिंग फुंकिले रणी' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

- ऐका. वाचा. म्हणा.



आभाळाची अम्ही लेकरे, काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही ।।

श्रमगंगेच्या तीरावरती
कष्टकऱ्यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही ।।

इमान आम्हा एकच ठावे
घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही ।।

माणुसकीचे अभंग नाते
अम्हीच अमुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा संत वेगळा नाही ।।

कोटि कोटि हे बळकट बाहू
जगन्नाथ-रथ ओढुन नेऊ
आस वेगळी नाही आम्हा ध्यास वेगळा नाही ।।

**शब्दार्थ : तीर** – किनारा. **इमान** – निष्ठा. **ठावे** – माहीत असणे. **अभंग** – अखंड. **आस** – इच्छा.



## स्वाध्याय

**प्र. १. खालील अर्थाचे कवितेतील शब्द शोधा.**

(अ) किनारा–

(आ) इच्छा–

(इ) अखंड–

(ई) आकाश–

**प्र. २. कवितेतील 'आत्मविश्वास' व्यक्त करणाऱ्या काव्यपंक्ती लिहा.**

**प्र. ३. कवितेतील ऐक्याचा संदेश देणाऱ्या काव्यपंक्ती लिहा.**

**प्र. ४. 'माणुसकीचे अभंग नाते अम्हीच अमुचे भाग्यविधाते' या काव्यपंक्तीतून कवीने सूचित केलेला विचार तुमच्या शब्दांत मांडा.**

**प्र. ५. कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.**

**प्र. ६. खालील कवितेच्या ओळींतील भाव तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) आभाळाची अम्ही लेकरे, काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही ।।

(आ) इमान आम्हा एकच ठावे
घाम गाळुनी काम करावे

## भाषेची गंमत

भाषेचा वापर करत असताना बोलताना व लिहिताना आपण नैसर्गिकरीत्या थांबतो. आपण आजूबाजूला वावरत असताना, प्रवास करत असताना अनेक पाट्या वाचतो. त्यावर काही सूचना दिलेल्या दिसतात. बऱ्याच वेळा काही शब्द योग्य ठिकाणी न जोडल्यास किंवा न तोडल्यास वाक्याचा अर्थ बदलून जातो व त्यातून गंमत निर्माण होते.

उदा., (१) येथे वाहन लावू नये.
येथे वाहन लावून ये.

(२) बागेत कचरा टाकू नये.
बागेत कचरा टाकून ये.

या प्रकारची तुमच्या वाचनात आलेली वाक्ये लिहा व त्यातील गंमत समजून घ्या.

P6LSHF

# ७. नातवंडांस पत्र

**नंदू नाटेकर** (नंदकुमार नाटेकर) (१९३३) : हे भारताचे माजी बॅडमिंटन राष्ट्रीय विजेते आहेत. नाटेकर यांनी भारतासाठी १५ वर्षांच्या कारकिर्दीत शंभरपेक्षा अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवले आहेत. त्यांनी एकूण सहा वेळा मॅन्ज सिंगल नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये मॅन्ज डबल नॅशनल चॅम्पियनशीप मिळवून एकूण सहा वेळा आणि मिश्र दुहेरी राष्ट्रीय स्पर्धेत पाच वेळा विजेतेपद मिळवले आहे. १९६१ मध्ये त्यांना अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

प्रस्तुत पाठातून लेखकाने निसर्ग सान्निध्यात गेलेले समृद्ध बालपण, बॅडमिंटनची आवड आणि सातत्यपूर्ण परिश्रम आणि यातून संपादित केले उज्ज्वल यश या गोष्टींविषयीचा संवाद पत्ररूपाने आपल्या नातवंडांशी साधला आहे. प्रस्तुत पाठ 'आजी-आजोबांची पत्रे' या पुस्तकातून घेतला आहे.



प्रिय उद्‌धव, मेघा, मिहिका व जान्हवी,
अनेक आशीर्वाद.

कितीदा तरी मनात येते, की तुम्हा चौघांबरोबर बसून तुमच्याशी मनसोक्त गप्पा माराव्यात. मी माझे बालपण कसे घालवले ते तुम्हांला सांगावे. माझे शाळा-कॉलेजातले दिवस कसे होते, ते सांगावे आणि पुस्तकांतून, मित्रांकडून व शिक्षकांकडून मी काय काय आणि कसे कसे शिकलो ते सांगावे आणि सगळ्यांत महत्त्वाचे, म्हणजे माझ्या आई-वडिलांकडून- तुमच्या पणजी-पणजोबांकडून, त्यांच्या मायेतून मी काय शिकलो, हेही तुमच्याशी बोलावे...

पण प्रत्यक्षात तुमच्याशी बोलताना मोकळेपणाने, मनासारखे बोलता येतेच असे नाही म्हणून वाटले, की तुम्हांला हे पत्र लिहावे.

मी शिकायला सांगलीला होतो. सांगली हे महाराष्ट्रातले एक गाव आहे. आमच्या शाळेला खूप मोठे मैदान होते आणि त्याजवळच एक बाग होती. आम्ही तिथे मनसोक्त खेळायचो, हुंदडायचो, झाडांवर चढायचो, पाऊस आला, की त्यात चिंब भिजायचो. निदान सुट्टीमध्ये तरी तुम्ही तुमच्या मोठ्या शहरांमधून बाहेर पडून थंड हवेच्या गिरीस्थानांवर किंवा छोट्या गावी गेले पाहिजे. पक्ष्यांचे चिवचिवणे, थवे न्याहाळणे, तसेच जंगलातील विविध पशूंचे आवाज ऐकणे हा मोठा मजेशीर अनुभव असतो. मोकळे आकाश, वाहती नदी आणि झाडे आपल्यासाठी गमतीचा नजराणाच आणत असतात, त्याची मजा तुम्ही लुटली पाहिजे.

माझ्यापुरते बोलायचे, तर मी अभ्यासामध्ये काही फारसा चांगला नव्हतो. मला खेळायला मात्र आवडायचे आणि बॅडमिंटनची आवड मला लहान वयातच लागली होती. निरनिराळे चषक व ढाली घेतलेले माझे कितीतरी फोटो तुम्ही पाहिले आहेत ना? सातत्याने परिश्रम करूनच मी विजेता खेळाडू होऊ शकलो. आंतरराष्ट्रीय सामन्यात आपल्या देशाचे मी प्रतिनिधित्व केले, मला अर्जुन पुरस्कार मिळाला.

तुम्ही कोणता ना कोणता खेळ खेळलाच पाहिजे. मग तो क्रिकेट, टेनिस, बॅडमिंटन असा तुम्हांला जो कोणता आवडत असेल तो खेळ असू दे. खेळ खेळण्यामुळे आपल्या आयुष्यात शिस्त येते. कोणत्याही प्रसंगाचा सामना कसा करायचा, अगदी हरावे लागले तरी कसे हरायचे, ते खेळ आपल्याला शिकवतात, जिंकलो तर जिंकण्याचा आनंदही मिळवून देतात.

प्रत्येकाने दररोज काहीतरी व्यायाम केलाच पाहिजे. मला वेळ नाही, ही सबब सांगू नका. वेळ नाही म्हणून जेवण करायचे राहते का? दोन्ही जेवणांसाठी

कसा बरोबर वेळ मिळतो? मी म्हणतो ते पटते का तुम्हांला? जर काहीच व्यायाम झाला नसेल, तर आज वयाच्या ६६ व्या वर्षीसुद्धा मला जेवावेसे वाटत नाही. तुम्ही जसे मोठे व्हाल, शाळांतून कॉलेजांत जाल, तसतसा तुम्हांला कमी कमीच वेळ राहणार आहे; पण तरी तुम्ही व्यायामासाठी तास-दोन तास काढलेच पाहिजेत. मग तो व्यायाम खुल्या मैदानावरील असो, एखाद्या क्लबातील असो किंवा खास व्यायामासाठीच असलेल्या 'जिम'मधला असो.

आयुष्यातील प्रत्येक गोष्ट शाळा-कॉलेजांमध्ये शिकवून येत नसते, होय ना? म्हणून तुम्ही जसे मोठे व्हाल तसे तुम्ही आपले स्वत:चे शिक्षक व्हा. टेनिसमध्ये एखादा चेंडू रेषेच्या आत आहे की बाहेर, हे आपले आपणच पडताळून पाहतो आणि त्याप्रमाणे तो खेळायचा की सोडून द्यायचा हे ठरवतो ना? तसेच प्रत्यक्ष आयुष्यामध्येदेखील आपल्याकरिता चांगले काय आणि वाईट काय, हे तुमचे तुम्हांला कळले पाहिजे. म्हणजेच, तुम्ही स्वत:वर अवलंबून राहायला शिकले पाहिजे. स्वावलंबी झाले पाहिजे.

आता आपण तिसऱ्या सहस्रकामध्ये प्रवेश करत आहात. संपर्कमाध्यमे, दळणवळण आणि संदेशवहनाचा आवाकाही वाढतो आहे. आता आपल्या घरी, बसल्या जागी, हवी ती माहिती तुम्हांला ई-मेल आणि इंटरनेटद्वारे मिळू शकते. तरीही तुमच्या मित्रांशी व कुटुंबियांशी असलेला आपला व्यक्तिगत संपर्क तुटू देऊ नका.

येत्या सहस्रकासाठी तुम्हांला माझ्या शुभेच्छा!

सप्रेम तुमचा,

आजोबा



**शब्दार्थ : गिरीस्थान** – पर्वतावरील ठिकाण. **नजराणा** – मौल्यवान भेट. **सबब** – कारण.



## स्वाध्याय

**प्र. १. आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **लेखकाने शाळेच्या बागेत मनसोक्त केलेली मजा**

(आ) **लेखकाचे सुट्टीतील मजेशीर अनुभव**

(इ) **तिसऱ्या सहस्रकातील परस्परसंबंध वाढवणारी व माहिती देणारी माध्यमे**

**प्र. २. एका शब्दांत उत्तर लिहा.**

(अ) लेखक जेथे शिकले ते गाव

(आ) लेखकाला मिळालेला पुरस्कार

(इ) खास व्यायामासाठीच असलेले ठिकाण

(ई) लेखकाचा आवडता खेळ

**प्र. ३. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) लेखकाने सांगितलेले व्यायामाचे महत्त्व.

(आ) खेळ आपल्याला स्वावलंबी बनवतो व निर्णयक्षमता वाढवतो.

**प्र. ४. गमतीचा नजराणा आणणारे निसर्गातील घटक व त्यासंदर्भातील तुम्ही अनुभवलेली एखादी घटना, याविषयीची माहिती सांगा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील तक्ता पूर्ण करा.**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| पुस्तक | |
| गाव | |
| मैदान | |
| नदी | |

**(आ) खालील वाक्ये वाचा व त्याआधारे तक्ता पूर्ण करा.**

(१) सांगली हे महाराष्ट्रातले गाव आहे.

(२) चांगले काय आणि वाईट काय हे तुमचे तुम्हांला कळते.

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| | | | |



## चर्चा करूया.

- ‘वनडे’ क्रिकेटची मॅच बघत असताना प्रेक्षकांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियांबाबत मित्रांशी चर्चा करून यादी तयार करा.

## लिहिते होऊया.

- **खालील मुद्द्यांच्या आधारे 'माझा आवडता खेळ' या विषयावर आठ ते दहा ओळी निबंध लिहा.**

**माझा आवडता खेळ**

- तो कसा खेळतात.
- खेळात मिळणारा आनंद
- तो खेळ का आवडतो?
- तुमचे प्रेरणास्थान.
- त्या खेळातील तुमचे कौशल्य कसे वाढवाल.

## वाचा.

- **खालील उतारा वाचा व त्यास योग्य शीर्षक द्या.**

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात सुखदु:खाचे क्षण नेहमीच येत असतात. दु:खाच्या व अडचणीच्या प्रसंगांना जे खिलाडू वृत्तीने सामोरे जातात, जे जिंकण्याच्या उर्मीने हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी स्वयंप्रेरणेने काम करतात, तेच आयुष्यात यश मिळवतात. कोणतीही वाईट परिस्थिती तुम्हांला अडवू किंवा हरवू शकत नाही. वेळप्रसंगी तुम्हांला दोन पावले मागेही टाकावी लागतात; परंतु जर आपण मनानेच हरलो, तर पुढील कार्य पूर्ण करण्यासाठी आपण तयार होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत कायम आपले आपल्या मनावर नियंत्रण असणे आवश्यक असते.

नकारात्मक विचार करण्यापासून आपण स्वत:ला थांबवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्या मनाला चांगल्या सवयी लावणेही आवश्यक आहे. आपल्या मनाला चांगली सवय लावणे हे कठीण असले, तरी अशक्य मात्र नक्कीच नाही! आपल्या अंगी असणाऱ्या चांगल्या सवयी, वाईट सवयींना जवळ येऊ देत नाहीत. मनाला चांगल्या विचारांची सवय लावली, तर ती सवय वाईट विचारांपासून तुम्हांला नक्कीच दूर ठेवील.

यासाठी तुम्हांला काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. उदा., चांगले वाचन, चांगल्या मित्रमैत्रिणींची संगत, घरातील ज्येष्ठ व्यक्तींशी असणारे जिव्हाळ्याचे व आपुलकीचे संबंध इत्यादी. जो दुसऱ्याच्या दु:खात नेहमी सहभागी होतो त्यालाच जीवनाचा खरा अर्थ कळतो. मानसिक आधार देऊन, विचारांच्या देवाणघेवाणीतून आपण एकमेकांचे दु:ख सहज हलके करू शकतो.

असे सुखदु:खाचे प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यात सतत येत असतात मात्र या प्रसंगांना जो धीराने सामोरा जातो, तोच जीवनात यशस्वी होतो.

P6VNP3

# पत्रलेखन

पत्र हे आपल्या मनातले भाव/विचार दुसऱ्यापर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवायचे उत्तम साधन आहे. पत्रलेखनाच्या विषयानुसार पत्राचे दोन प्रमुख प्रकार पडतात.

(१) औपचारिक पत्र

(२) अनौपचारिक पत्र

यापूर्वीच्या इयत्तांमध्ये तुम्हांला अनौपचारिक या पत्र प्रकारांची ओळख झालेली आहे. आता आपण औपचारिक पत्रप्रकाराची ओळख करून घेणार आहोत.

**लक्षात घ्या–** आजच्या तंत्रज्ञान युगात फोनचा वापर वाढल्यामुळे पत्र लिहिणे कमी झाले आहे. तरीही आपल्याला अर्ज करणे, मागणी करणे, विनंती करणे अशा काही कारणांसाठी पत्र लिहिणे आवश्यक असते व पत्रलेखन कौशल्य प्राप्त होण्यासाठी या इयत्तेत तुम्हांला औपचारिक पत्रलेखनाचा अभ्यास करायचा आहे. आता आपण औपचारिक पत्रलेखनाचे स्वरूप समजून घेऊया.

- **औपचारिक पत्रलेखनासाठी आवश्यक गोष्टी :**

(१) ज्यांना पत्र लिहायचे आहे त्यांच्या पदाचा शिष्टाचारपूर्वक उल्लेख करावा.

(२) भाषा सरळ, सुगम, सुस्पष्ट व विषयानुरूप असावी.

(३) पत्रात केवळ मुख्य विषयाबाबतच लिहावे.

(४) ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे पद, वय, योग्यता, शिक्षण इत्यादी सर्व गोष्टी लक्षात घेऊन योग्य भाषेचा वापर करावा.

(५) पत्राची भाषा लेखननियमांनुसार असावी.

- **औपचारिक पत्र लिहिण्यासाठी खाली दिलेल्या प्रारूपाचा अभ्यास करा.**

## औपचारिक पत्र प्रारूप

पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता

दिनांक :

प्रति,

माननीय.............,

(योग्य त्या मान व पदासह ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे नाव, हुद्दा व पत्ता)

विषय : ............................ (पत्राचे कारण)


महोदय,

विषयानुसार मजकूर

आपला विश्वासू,

पत्र पाठवणाऱ्याची सही

व नाव




(**प्रति –** ज्याला पत्र पाठवायचे ती व्यक्ती,
**प्रेषक –** जो पत्र पाठवतो ती व्यक्ती.)

**कृती– वरील प्रारूपाचा अभ्यास करून खालील विषयावर पत्रलेखन करा.**

तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबिर आयोजित केले आहे. त्यात तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.

**टीप :** औपचारिक व अनौपचारिक दोन्ही प्रकारची पत्रे आज तंत्रज्ञानाच्या साहाय्याने म्हणजे ईमेलद्वारा पाठवली जातात. ईमेल पाठवण्याचे पत्राचे प्रारूप व तंत्र जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

**भाषासौंदर्य**

- **आलंकारिक शब्दांची रचना करून भाषेचे सौंदर्य वाढवता येते. आपले विचार अधिक परिणामकारक, अधिक आकर्षक होण्यासाठी आलंकारिक शब्दांचा उपयोग केला जातो. खाली काही आलंकारिक शब्द दिलेले आहेत. त्यांचा अभ्यास करा व लेखनात उपयोग करा. या शब्दांप्रमाणे इतर काही आलंकारिक शब्दांची यादी तयार करा.**
  - गळ्यातला ताईत – अत्यंत प्रिय
  - बाळकडू – लहानपणीचे संस्कार
  - काथ्याकूट – निष्फळ चर्चा
  - अष्टपैलू – अनेक बाबींमध्ये प्रवीण
  - अळवावरचे पाणी – अल्प काळ टिकणारे
  - अजातशत्रू – ज्याला कोणी शत्रू नाही असा
  - झाकले माणिक – गुणांचे प्रदर्शन न करणारा गुणी मनुष्य
  - इतिश्री – शेवट
  - अक्षरशत्रू – निरक्षर, अशिक्षित

# ८. गिर्यारोहणाचा अनुभव

भाग - २

**रमेश महाले** (१९४४) : प्रसिद्ध लेखक. मुलांसाठी बालकथा व विज्ञान विषय यावर आधारित त्यांची १०९ पुस्तके प्रकाशित आहेत. जळगाव व नाशिक आकाशवाणीवरील विविध व्याख्यानात सहभाग. त्यांच्या 'पक्ष्यांची दुनिया' या पुस्तकास मराठी विज्ञान परिषदेचा तसेच साहित्य परिषदेचा पुरस्कारही मिळाला आहे. सन २००८ साली 'विज्ञान', २०११ साली 'अंतराळातील स्टेशन' व २०१३-१४ साली 'चला अंतराळात' या पुस्तकांस राज्यशासनाचा 'उत्कृष्ट वाङ्‌मय निर्मिती पुरस्कार' मिळाला आहे.

गंगोत्री येथे गिर्यारोहणासाठी गेलेले विद्यार्थी तेथे उद्‌भवलेल्या ढगफुटीच्या आणि भूस्खलनाच्या आपत्तीत यात्रेकरूंना मदत करून माणुसकीचे दर्शन कसे घडवतात, याचा वस्तुपाठ या पाठात पाहायला मिळतो. प्रस्तुत पाठ 'किशोर', दिवाळी अंक २०१४ मधून घेतला आहे.

शाळेला सुट्टी लागणार होती. ईशान विचार करत होता, की ही सुट्टी कशी घालवायची? व्हिडिओ गेम खेळून त्याला कंटाळा आला होता. मित्रांबरोबर रोज क्रिकेट, फुटबॉल आणि बॅडमिंटनही खेळता येऊ शकणार होते. शिवाय त्याच त्याच रोमांचक कथा वाचण्यात त्याला विशेष गोडी नव्हती.

ईशान विचार करू लागला, या वेळी सुट्टीमध्ये काहीतरी नवीन करावे. काहीतरी असे केले पाहिजे, की सर्व कंटाळा नाहीसा होईल; परंतु बराच विचार करूनही त्याला सुट्टी घालवण्याचा योग्य पर्याय सापडत नव्हता. तेवढ्यात त्याला दिलासा मिळणारी घटना घडली. त्याला उत्तर काशीच्या गिर्यारोहण संस्थेकडून आपल्या कॉम्प्युटरवर एक ई-मेल प्राप्त झाला. तोच ईशानच्या मित्रांनाही पाठवण्यात आला होता. गिर्यारोहण संस्थेने त्यांना आपल्या एका मोहिमेमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण पाठवले होते.


वास्तविक ईशानला गिर्यारोहणाचा विशेष छंद होता. गिर्यारोहण आता त्याचा छंद राहिला नव्हता, तर त्याचे त्याला वेड लागले होते. त्याने आपल्या शहरातील एका प्रसिद्ध गिर्यारोहण संस्थेत आधीच प्रवेश घेतला होता आणि उत्कृष्ट प्रशिक्षणातून त्याला गिर्यारोहणातील बऱ्याच बारीकसारीक गोष्टी समजल्या होत्या. त्याचे अनेक मित्रही याच संस्थेत गिर्यारोहण शिकत होते आणि त्यांनी ईशानबरोबर पहाडावर अनेक प्रशिक्षण कार्यक्रमांत भाग घेतला होता.

गिर्यारोहणाचा अनुभव खरोखर रोमांचक होता. आकाशाला स्पर्श करणारे उंच पहाड, विशालकाय खडक, हिरव्यागार घाटी आणि वेगाने वाहणाऱ्या स्वच्छ पाण्याच्या पहाडी नद्या ईशान आणि त्याच्या साथीदारांना साद घालत होत्या. त्यांना जेव्हा संधी मिळेल, तेव्हा ते आवश्यक उपकरणे आणि सामानाची बॅग घेऊन गिर्यारोहण करायला जात असत.

उत्तर काशीच्या गिर्यारोहण संस्थेचा संदेश वाचल्यावर ईशान फारच खूश झाला. त्याने लगेच या निमंत्रणाची माहिती आपले मित्र धैर्य, प्रशांत, अमन आणि सक्षम यांना दिली. सर्वच मित्र फार खूश झाले. ते जणू सुट्टीत पहाडावर जाण्याची वाटच पाहत होते. शाळेला सुट्टी लागण्यापूर्वीच त्यांनी पहाडावर जाण्याची तयारी सुरू केली होती.

शाळेला सुट्टी लागल्याबरोबर सर्व मित्र टॅक्सीने ऋषिकेशहून उत्तर काशीला पोहोचले. वाटेत उंच उंच पहाड पाहून ते फार रोमांचित झाले होते.

गिर्यारोहण संस्थेच्या आपल्या साथीदारांना भेटल्यावर ईशान आणि त्याचे मित्र खूप उत्साहित झाले होते. सर्व मित्रांनी मिळून माऊंटेनिअरिंगच्या साहाय्याने उत्तर काशीहून गंगोत्रीला जाण्याचा निश्चय केला.



गिर्यारोहण सुरू झाले. उंच पहाडावर गिर्यारोहण करणे काही सोपे काम नव्हते. अनेक तासांच्या कठीण आणि थकवणाऱ्या चढाईनंतर शेवटी ते गंगोत्रीला पोहोचले. ईशान आणि त्याचे साथीदार गंगोत्रीला पोहोचल्यामुळे फार उत्साहित झाले होते आणि ते आपला सर्व थकवा विसरून गेले होते; परंतु गंगोत्रीला पोहोचल्यानंतर त्यांनी जे पाहिले, ते काळजाला घर पाडणारे दृश्य होते. पहाडामधून आलेले ढग अकस्मात फुटले आणि गंगोत्रीवर भीषण हाहाकार माजला होता. पाण्याच्या धोकादायक प्रवाहामुळे मंदिर परिसरच नव्हे, तर दुकाने, हॉटेल्स आणि धर्मशाळा उद्ध्वस्त करून टाकल्या होत्या. बरीच घरे आणि गेस्ट हाऊस नदीच्या वेगवान प्रवाहाबरोबर वाहून गेले होते. या भीषण तांडवामध्ये बरेच लोक मृत्युमुखी पडले होते. नदीने रौद्र रूप धारण केले होते.

या तांडवात आपल्या आप्तेष्टांना गमावल्यामुळे लोक स्फुंदून स्फुंदून रडत होते. भूस्खलन झाल्यामुळे ठिकठिकाणी अनेक तीर्थयात्री अडकले होते. ते बिचारे चारधाम यात्रा करायला निघाले होते; परंतु येथे त्यांना सर्वस्व गमवावे लागले होते. ईशान आणि त्याच्या साथीदारांनी पहाडावर हे सर्व पाहिले, तेव्हा त्यांच्या अंगावर काटे आले आणि गिर्यारोहणाचा सर्व उत्साहच नाहीसा झाला. ईशान आणि त्याचे साथीदार ही परिस्थिती मूकपणे पाहू शकत नव्हते.

अचानक तेथे भुकेने व्याकूळ झालेल्या एका मुलाने आपल्या वडिलांकडे बिस्किटांची मागणी केलेली ईशानने पाहिले. वडिलांनी जेव्हा दुकानदाराला बिस्किट पुड्याची किंमत विचारली तेव्हा तो म्हणाला, ''बिस्किटांचा एक पुडा शंभर रुपयांना मिळेल आणि पाण्याची बाटली दोनशे रुपयांना मिळेल.''

दुसरा एक हॉटेलमालक जेवणाच्या थाळीची किंमत दोन हजार रुपये वसूल करत होता. दुकानदारांची ही मनमानी पाहून ईशान आणि त्याचे साथीदार हैराण झाले होते. ते विरोध करत दुकानदाराला म्हणाले, ''काका, ही तर सरळ लूटमार आहे. पाच रुपयांत मिळणाऱ्या बिस्किट पुड्याची किंमत शंभर रुपये आणि पंधरा रुपयांच्या पाण्याच्या बाटलीची किंमत दोनशे रुपये कशी काय असू शकते?''

''मुलांनो, तुम्ही आपले काम करा. येथे पहाडावर वस्तू याच भावाने मिळतात. ज्याला गरज वाटेल, तो खरेदी करेल.'' दुकानदार रागाने म्हणाला.

ईशान आणि त्याचे साथीदार गप्प बसले. त्यांनी अडचणीत सापडलेल्या यात्रेकरूंना मदत केली. जखमी यात्रेकरूंवर प्रथमोपचार केले. त्यांची मलमपट्टी केली आणि औषधे दिली. हरवलेल्या यात्रेकरूंचा शोध घेण्यासाठी त्यांनी मदत केली आणि भुकेल्या मुलांना आपल्याबरोबर आणलेली फळे, बिस्किटे व पाण्याच्या बाटल्या दिल्या.

संध्याकाळ झाली होती. ईशानला आता खूप भूक लागली होती. त्याच्या साथीदारांनाही भूक लागली होती. त्यांना विश्रांतीची गरज जाणवत होती. पहाडाच्या कडेला एक हॉटेलसारखे घर दिसल्यावर ते मोठ्या आशेने घरमालकाकडे गेले आणि म्हणाले, ''काका, आम्हांला खाण्यासाठी थोडे अन्न आणि रात्रभर मुक्काम करण्यासाठी एखादी खोली देऊ शकाल?''

''हो, परंतु जेवणासाठी दहा हजार आणि खोलीचे भाडे पंधरा हजार रुपये द्यावे लागेल.'' दुकानदार काहीशा रुक्ष स्वरात म्हणाला.

ते ऐकून ईशान म्हणाला, ''परंतु काका, जेवणाची ही किंमत आणि खोलीचे भाडे फार जास्त आहे.''

''मुला, जीव वाचवण्यासाठी ही किंमत तर काहीच नाही. जरा विचार कर, जर भूक लागल्यावर तुम्हांला जेवण मिळाले नाही आणि रात्रभर खुल्या आकाशाखाली झोपावे लागले, तर तुमचे काय हाल होतील?''

तेवढ्यात अचानक मोठा आवाज झाला. ईशान आणि त्याचे साथीदार आपापसात विचारविनिमय करत होते, अचानक पहाडावरील एक घर मोठा आवाज होऊन खाली कोसळले. सर्वजण पडलेल्या घरात दाबले गेले.

ईशान आणि त्याचे साथीदार सर्व काही विसरून कामाला लागले. घरात राहणारे लोक देवदारच्या झाडात अडकले होते. ईशानला अशा परिस्थितीचा चांगला अनुभव होता. त्याने गिर्यारोहण संस्थेत पहाडावरून खाली पडलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे खास प्रशिक्षण घेतले होते. तो जाड व मजबूत दोराच्या साहाय्याने खाली उतरला आणि अडकलेल्या त्या सर्वांना बाहेर काढले.

ईशान व त्याच्या साथीदारांना ती रात्र पहाडावर घालवावी लागली. त्यांनी आपल्याबरोबर नायलॉनचा तंबू आणला होता. त्या आधुनिक तंबूत त्यांची कोणतीही

गैरसोय झाली नाही. पहाडावर झालेल्या या दुर्घटनेची माहिती सेनेला मिळाली होती आणि हवाईदलाच्या हेलिकॉप्टरने ‘बचाव अभियान’ सुरूही केले होते.

सकाळ झाल्यावर ईशानने व त्याच्या मित्रांनी आसपासच्या जंगलातून लाकडे गोळा करून आणली व त्यांना आग लावली. त्यातून खूप धूर झाला. हा हवाईदलाच्या हेलिकॉप्टरसाठी एक संकेत होता. योगायोगाने एक हेलिकॉप्टर धूर पाहून खाली आले व पहाडाच्या वर घिरट्या घालू लागले. हवाईदलाच्या जवानांनी पहाडावर अडकलेल्या यात्रेकरूंना, ईशान व त्याच्या साथीदारांना पाहिले. ईशान व त्याच्या साथीदारांनी यात्रेकरूंना हेलिकॉप्टरपर्यंत पोहोचवायला हवाईदलाच्या जवानांना मदत केली.

हवाईदलाच्या हेलिकॉप्टरने सर्वांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवले होते. हवाईदलाच्या अधिकाऱ्यांना जेव्हा ईशान व त्याच्या साथीदारांचे बहादुरीचे कार्य समजले, तेव्हा त्यांनी सर्वांची प्रशंसा केली. एवढेच नव्हे, तर त्यांनी या मुलांना वीरपदक मिळावे म्हणून राष्ट्रपतींकडे शिफारस केली.

तिकडे ईशान आणि त्याचे साथीदार पहाडावर झालेल्या दुर्घटनेनंतर सुरक्षित घरी पोहोचले, तेव्हा ते फार खूश झाले होते. गिर्यारोहणाचा हा अनुभव त्यांच्यासाठी कायम स्मरणात राहणारा होता.

**शब्दार्थ : गिर्यारोहण** – पर्वत चढणे. **घाटी** – लहान घाट. **काळजाला घरे पडणे** – प्रचंड दु:ख होणे. **रौद्ररूप** – भयानक रूप. **स्फुंदून स्फुंदून –** हुंदके देऊन. **भूस्खलन** – जमीन खचणे. **अंगावर काटे येणे** – प्रचंड भीती वाटणे. **मनमानी करणे –** मनाला वाटेल तसे वागणे. **हैराण होणे –** त्रासून जाणे.



## स्वाध्याय

**प्र. १. आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **ईशानला कंटाळा आलेल्या व गोडी न वाटणाऱ्या गोष्टी**

(आ) **गिर्यारोहणाच्या रोमांचक अनुभवात ईशानने बघितलेल्या नैसर्गिक गोष्टी**

(इ) **ईशान आणि त्याच्या सहकाऱ्यांनी यात्रेकरूंना केलेली मदत**

**प्र. २. एका शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) ज्या गिर्यारोहण संस्थेकडून ईशानला ई-मेल आला ते ठिकाण

(आ) अनेक तासांच्या व थकवणाऱ्या चढाईनंतर सर्व मित्र पोहोचले ते ठिकाण

(इ) बहादुरीच्या कार्यासाठी मिळणारे पदक

**प्र. ३. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) पाठ अभ्यासल्यानंतर तुम्हांला जाणवणारी ईशानची गुणवैशिष्ट्ये लिहा.

(आ) ईशान आणि त्याचे सहकारी यांनी यात्रेकरूंना केलेली मदत तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) 'कडाक्याची थंडी पडली आहे' अशी कल्पना करून परिसरातील असाहाय्य व्यक्तीला कोणती मदत कराल, ते लिहा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) काळजाला घरे पडणे. | (अ) त्रासून जाणे. |
| (२) मनमानी करणे. | (आ) प्रचंड दु:ख होणे. |
| (३) हैराण होणे. | (इ) मनाप्रमाणे वागणे. |

**(आ) खालील शब्दांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य तयार करा.**

(१) गिर्यारोहण- (२) रौद्र रूप- (३) भूस्खलन-

**(इ) 'बे' हा उपसर्ग लावून खालील शब्द तयार करा व लिहा.**

उदा., बेवारस

(१) जबाबदार-

(२) इमान-

(३) शिस्त-

(४) रोजगार-

(५) पर्वा-

**(ई) खालील तक्त्यात विरामचिन्हांची नावे लिहून, त्यांचा वापर करून वाक्ये तयार करा.**

| विरामचिन्हे | नावे | वाक्य |
|---|---|---|
| , | | |
| . | | |
| ; | | |
| ? | | |
| ! | | |
| ' ' | | |
| " " | | |

**उपक्रम :** भारतातील गिर्यारोहण संस्थांबद्‌दल आंतरजालाच्या साहाय्याने माहिती मिळवा व राज्यनिहाय संस्थांच्या नावांचे तक्ते बनवा.



## वाचा.

- **खालील उतारा वाचा. त्याचा तुम्हांला समजलेला अर्थ सारांश रूपाने पुन्हा लिहा.**

आपल्यासारख्या सामान्यांना शब्दावाचूनचे संवाद भावणारही नाहीत, की परवडणारही नाहीत. आपल्याला कठीण, साधे, सरळ, वक्र कसे का होईना; पण बोलणे आणि ठणठणीत बोलणेच हवे असते आणि या बोलण्याचे किती अनंत प्रकार असतात. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्या चालीवर 'माणसे तितकी बोलणी' अशी म्हण बनवायला हरकत नाही. 'मोकळा संवाद' असे आपण म्हणतो; पण समाजात वावरताना या तथाकथित मोकळ्या संवादावर कशी आणि किती बंधने पडत असतात ते पाहिले म्हणजे गंमत वाटते. मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपण खूप मुक्त, मोकळे असतो अशी आपली समजूत असते; पण ती खरी असते का? आपणाला एकमेकांचे अनेक गुणदोष, एकमेकांच्या जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात; त्यामुळे तिथे कधी मोकळ्या गप्पा होत असल्या, तरी अनेकदा नात्यातल्या जवळिकीमुळेच कधी कधी एक चमत्कारिक अवघडलेपणही अनुभवाला येते. एकमेकांची मते, आग्रह, दुराग्रह ठाऊक असल्यामुळे मतभेदाचे अवघड विषय बहुधा आपण शिताफीने टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहीत असल्यामुळे बोलतांना त्यांना कुठे धक्का लागणार नाही, समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही, याची सतत काळजी घ्यावी लागते.

## जाहिरात लेखन

विद्यार्थ्यांनो, मागील इयत्तांमध्ये तुम्हांला 'जाहिरात' या घटकाची ओळख झालेली आहे. विविध वस्तू अथवा सेवा या चांगल्या कशा आहेत, हे जाहिरातींद्‌वारे पटवून दिलेले असते.

जाहिरात म्हणजे 'जाहीर करणे' होय. इंग्रजीत 'जाहिरात' या शब्दासाठी 'Advertisement' हा शब्द वापरला जातो. जाहिरातीचा मुख्य उद्‌देश वस्तू किंवा सेवांकडे ग्राहकांचे लक्ष वेधून घेणे व त्यांची मागणी निर्माण करणे असा असतो. त्याचबरोबर शासन व काही समाजसेवी संस्था यांच्यातर्फे समाजप्रबोधनासाठी व जनहिताय काही जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात.जाहिरात ही एक कला आहे. तुम्ही अनेक जाहिरातींचे वाचन, निरीक्षण व श्रवणही करत असता. त्यांचे तुम्हांला आकलन होणे, हे आजच्या काळातील आवश्यक कौशल्य आहे.

जाहिरातीच्या श्रवण व वाचनाने जाहिरातीतील उत्पादनाबद्‌दल/सेवेबद्‌दल माहिती मिळणे व विक्रेता म्हणून इतरांच्या मनात त्याबद्‌दल कुतूहल, आकर्षण निर्माण करणे ही दोन्ही कौशल्ये आत्मसात करणे, हा जाहिरात या घटकाच्या अभ्यासाचा मूळ हेतू आहे.

- खालील जाहिरातीचे वाचन व निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

## *जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक डिजिटल शाळा, मोरगाव.*

प्रवेश सुरू



इयत्ता पहिली ते आठवी

**आपला प्रवेश आजच नोंदवा.**

**शाळेची वैशिष्ट्ये**

(१) डिजिटल शाळा
(२) ई-लर्निंग सुविधा
(३) वैयक्तिक मार्गदर्शन
(४) पालकांसाठी SMS सुविधा
(५) सांस्कृतिक कार्यक्रमांतून कलागुणांचा विकास
(६) क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**विद्यार्थी योजना**

(१) मोफत प्रवेश
(२) मोफत पाठ्यपुस्तके
(३) शासकीय गणवेश योजना
(४) मुलींना उपस्थिती भत्ता
(५) इतर विविध योजना

**१००% गुणवत्तेची हमी**

**सौजन्य– शाळा व्यवस्थापन समिती मोरगाव**

**(अ) उत्तरे लिहा.**

(१) जाहिरातीचा विषय–
(२) जाहिरात देणारे (जाहिरातदार)–
(३) वरील जाहिरातीत सर्वांत जास्त आकर्षित करून घेणारा घटक–
(४) जाहिरात कोणासाठी आहे ?

**(आ) वरील जाहिरात अधिक आकर्षक होण्यासाठी त्यांत कोणकोणत्या घटकांचा समावेश असावा, असे तुम्हांला वाटते ?**

**(इ) तुमच्या मते जाहिरातीमधील महत्त्वाची वैशिष्ट्ये.**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

P75JQQ

# ९. झुळूक

**दामोदर कारे :** प्रसिद्ध कवी. त्यांच्या विविध विषयांवरील काव्यरचना प्रसिद्ध आहेत. ‘निसर्ग’ हा त्यांच्या कवितांचा आवडता विषय आहे.

आपण वाऱ्याची झुळूक झालो तर कोठे कोठे जाता येईल, काय काय पाहता येईल आणि कोणकोणत्या गमती जमती करता येतील याचे मजेदार वर्णन प्रस्तुत कवितेत कवीने केले आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे


कधी बाजारी कधी नदीच्या काठी
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी
हळु थबकत जावे कधी कानोसा घेत
कधी रमत गमत वा कधी भरारी थेट

लावून अंगुली कलिकेला हळुवार
ती फुलून बघे तो व्हावे पार पसार
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा
तो दिशादिशांतुनी फिरता उधळुनी द्यावा

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर
झुळझुळ झऱ्याची पसरावी चौफेर
शेतात पाचुच्या, निळ्या नदीवर शांत
खुलवीत मखमली तरंग जावे गात

वेळूच्या कुंजी वाजवुनी अलगूज
कणसांच्या कानी सांगावे हितगूज
शिंपावी डोही फुले बकुळीची सारी
गाळुनी जांभळे पिकली भुळभुळ तीरी

दिनभरी राबुनी दमला दिसता कोणी
टवटवी मुखावर आणावी बिलगोनी
स्वच्छंद अशा या करुनी नाना मौजा
घ्यावया विसावा यावे मी तिन्हीसांजा



**शब्दार्थ :** **ओढ** – आकर्षण. **स्वैर** – मुक्त. **राई** – बाग. **कानोसा घेणे** – चाहूल घेणे. **अंगुली –** बोट. **पसार होणे** – पळून जाणे. **कुंज** – वन. **अलगूज** – बासरी. **हितगूज** – गुजगोष्टी, मनातल्या गोष्टी सांगणे. **राबणे –** कष्ट करणे.



## स्वाध्याय

**प्र. १. आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **सानुल्या झुळकेच्या इच्छा**
↓ ↓ ↓ ↓

(आ) **सानुल्या झुळकेच्या प्रवासाचे स्वरूप**
- 
- 
- 
- 

(इ) **सानुल्या झुळकेची लोकोपयोगी कामे**
↓ ↓ ↓

**प्र. २. योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा**

(अ) झुळकेला स्वैर झुकावे वाटते, कारण.....
- (१) तिला स्वातंत्र्य हवे असते.
- (२) तिला सर्वत्र हिंडायचे असते.
- (३) तिचे मन तिकडे ओढ घेते.
- (४) तिला लोक आमंत्रण देतात.

(आ) वेळूच्या वनात अलगूज वाजते, कारण.....
- (१) झुळूक स्वत:च गाणे गाते.
- (२) तिथे गुराखी अलगूज वाजवतो.
- (३) तिथे ध्वनिफित लावलेली असते.
- (४) झुळकेच्या स्पर्शामुळे वेळूतून अलगूजाचा आवाज निघतो.

**प्र. ३. परिणाम लिहा.**

(अ) झुळकेने कलिकेला स्पर्श केला–

(आ) बकुळीच्या फुलांना स्पर्श केला–

**प्र. ४. खालील शब्दसमूहांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(अ) चुकलीमुकली लकेर–

(आ) पाचूचे मखमली शेत–

**प्र. ५. एक ते दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) झुळकेने भेट दिलेली नैसर्गिक ठिकाणे–

(आ) कवितेतील वर्णनावरून कवीने वर्णन केलेला ऋतू–

(इ) झुळकेचा विश्रांतीचा प्रहर–

## खेळूया शब्दांशी.

**(अ) कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.**

(१) व्हावे- (२) काठी- (३) हळूवार- (४) अलगूज-

**(आ) खालील शब्दांना कवितेतील शब्द शोधा.**

(१) छोटी- (२) ताजेपणा- (३) बोट- (४) पावा-

**(इ) तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) झुळुकेची परोपकारी वृत्ती.

(आ) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण.

## कल्पक होऊया.

- **'तुम्ही पक्षी आहात' अशी कल्पना करून तुम्हांला स्वच्छंदीपणे कोणकोणत्या गोष्टी करायला आवडतील, ते लिहा.**

## चला संवाद लिहूया.

- **नदी व झाड या दोघांमधील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.**





नदी : ..........................................................................

झाड : ..........................................................................

नदी : ..........................................................................

झाड : ..........................................................................

नदी : ..........................................................................

झाड : ..........................................................................

P7EFSD

# १०. आम्ही हवे आहोत का?

**शांता शेळके** (१९२२-२००२) : प्रसिद्ध कवयित्री, गीतकार, लेखिका. शांता शेळके यांनी जवळपास शंभर पुस्तके लिहिली आहेत. त्यांची 'वर्षा', 'रूपसी', 'जन्मजान्हवी', 'पूर्वसंध्या', 'इत्यर्थ' हे कवितासंग्रह; 'तोच चंद्रमा', 'कळ्यांचे दिवस फुलांच्या राती', 'चित्रगीते'; 'शब्दांच्या दुनियेत', 'पावसाआधीचा पाऊस', 'संस्मरणे' हे लेखसंग्रह; 'मुक्ता', 'गुलमोहर', 'काचकमळ' हे कथासंग्रह इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. आळंदी येथे भरलेल्या ६९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले.

प्राण्यांच्या इस्पितळात मारलेल्या फेरफटक्याचे आणि माणसाच्या प्रेमासाठी आसुसलेल्या प्राणिविश्वाचे चित्रण या पाठात पाहायला मिळते. प्रस्तुत पाठ 'आनंदाचे झाड' या ललित लेखसंग्रहातून घेतला आहे.

मुंबईच्या परळ भागात एक इस्पितळ आहे. ते आहे जनावरांचं इस्पितळ. ते आतून बघायचं असं माझ्या मनात खूप दिवसांपासून होतं. एकदा तो योग आला. कमानीच्या आत तर सहज प्रवेश मिळाला. उजवीकडं एक छोटीशी इमारत दिसते. हे बहुधा कार्यालय असावं. कार्यालयाच्या दाराशीच भिंतीवर एक मोठी तसबीर आहे. त्या तसबिरीत बैल, घोडा, कुत्रा, मांजर, शेळी अशी वेगवेगळ्या जनावरांची चित्रं आहेत. खाली एक छोटंसं पण मनाला भिडणारं वाक्य आहे, 'आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हांला आम्ही हवे आहोत का?'




माणसाच्या दयाबुद्धीला, करुणेला मुक्या प्राण्यांनी केलेलं ते आवाहन होतं. मला आत कुठंतरी हालवून सोडतं. आता मी कार्यालयात पाऊल टाकते. समोरच्या कपाटावर उदी रंगाचा एक गलेलठ्ठ बोका मजेत आपल्या मिशा साफ करत बसला आहे. मला बघताच तो कपाटावरून उडी मारतो आणि साहेबांच्या टेबलावर येऊन बसतो.

इस्पितळ बघण्यासाठी मी आले आहे, असं मी त्या साहेबांना सांगते. बोक्याचं डोकं कुरवाळत ते माझं ऐकून घेतात आणि लगेच मला परवानगी देऊन टाकतात. इतकंच नाही, तर मला सारं इस्पितळ नीट दाखवण्यासाठी भरत नावाचा एक छोटा चुणचुणीत मुलगाही ते माझ्याबरोबर देतात.

आम्ही पुढं जाऊन डावीकडं वळतो. एवढ्यात भरत मला म्हणतो, ''बाई, हा मांजरांचा विभाग बघायचाय?''

मांजरांचा विभाग म्हटल्यावर मी उत्सुकतेनं आत पाऊल टाकते. एक लहानशी पण स्वच्छ खोली. आपल्या स्वयंपाकघरातले ओटे जेवढ्या उंचीचे असतात तेवढ्या उंचीचे कट्टे आणि त्यांच्याखाली एकेरी जाळीने विभागलेले छोटे छोटे खण. बाहेरच्या बाजूनंही या खणांना जाळ्या बसवलेल्या आहेत. प्रत्येक खोलीत एक एक पेशंट आहे.

एक भलाथोरला काळाभोर बोका आपल्या हिरव्या डोळ्यांनी व्याकुळ नजरेनं बघत आहे. एक चिमुकलं कबरं पिलू कावरंबावरं झालं आहे. एक मांजरी चिडलेल्या वाघिणीसारखी पिंजऱ्यात इकडूनतिकडं फेऱ्या मारत आहे. एक ठिपक्याठिपक्यांचं मांजर आपण पेशंट आहोत हे विसरून मार्जारजातीच्या स्वच्छतेच्या आवडीनुसार आपल्या पंजानं तोंड, मिशा, डोळे पुसून साफ करत आहे. एक मांजर खूप आजारी असावं; कारण ते

डोळे मिटून पुढल्या दोन पंजांवर तोंड ठेवून गप पडलं आहे. प्रत्येक मांजराजवळ दोन बशा आहेत. एक खाद्यपदार्थासाठी व दुसरी पाण्याची. प्रत्येकाजवळ त्याच्या प्रकृतीतले चढउतार दाखवणारा तक्ता भिंतीवर लावला आहे. प्रत्येकाला बसायला मऊ अंथरुण आहे.

मी आणि भरत खोलीत पाऊल टाकतो मात्र, सारी मांजरं चमकतात. त्यांच्या डोळ्यांत आतुरता काठोकाठ भरली आहे. काही मांजरं जाळीवर नाक घासू लागतात. काही नखांनी जाळ्या खरवडू लागतात. 'मियाँव, मियाँव, मियाँव', कोवळ्या, निबर, भरीव, किनऱ्या आवाजांचा एकच कलकलाट सुरू होतो. प्रत्येक मांजर आपापल्या परीनं माझं लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करत आहे. प्रत्येकजण जणू म्हणत आहे, 'मला इथं फार एकटं वाटतंय. जरा माझ्याकडं या हो. मला कुरवाळा.'

मी जाळीच्या छिद्रांतून बोटं घालून कुणाचं डोकं खाजवते, कुणाचा गळा खाजवते तर कुणाचे कान कुरवाळते. मांजरं खूष होतात. पोटांतून 'गुर्रगुर्र' आवाज काढून समाधानाची पावती देतात.

आता माझं लक्ष एका गोष्टीकडं जातं. प्रत्येक मांजराच्या कप्प्यामध्ये त्याचं नाव लिहिलेलं आहे. 'जॅक जाधव', 'बकुल गोखले', 'सॅमी डिकुन्हा', 'रोमल टिपणीस'.

जाधव, गोखले, डिकुन्हा, टिपणीस! माझ्या ध्यानात येतं, ही आहेत मांजरांना दिलेली त्यांच्या मालकांची आडनावं!

त्या जाधव, गोखले, टिपणीस इत्यादी मंडळींचा डोळ्यांनी निरोप घेऊन मी बाहेर पडते. मला निरोप देताना पुन्हा एकदा 'मियाँव'चा गजर होतो. भेटीला आलेला माणूस परत जायला निघाला म्हणजे इस्पितळाच्या पेशंटच्या चेहऱ्यावर जी खिन्नता दिसते, तीच या मांजरांच्या चेहऱ्यावर मला दिसली. घरी लाड करून घ्यायची सवय झालेल्या या मांजरांना इथं विलक्षण एकटं एकटं वाटत असलं पाहिजे.

''या मांजरांना औषधपाणी माणसांसारखं करतात का रे?'' मी भरतला विचारलं.

''तर तर!'' असं म्हणून भरत सांगतो, ''त्यांचं खाणंपिणं पथ्याचं असतं, बाई.'' एकदम भरतला काहीतरी आठवतं. तो मला म्हणतो, ''बाई, शेजारी कुत्र्यांचा विभाग आहे, तिथं जाऊ या जरा.''

आम्ही शेजारच्या विभागात जातो. बघते, तर खरंच एक भली दांडगी अतिशय देखणी कुत्री तिथं निजलेली दिसली. जवळच एका टोपलीत तिची बरीच पिलं आहेत. अजून डोळेही न उघडलेल्या त्या पिलांच्या अंगांवरून मी हलकेच बोटं फिरवते. त्यांची आई तपकिरी रंगाची आहे; पण पिलं पांढरी. काही ठिपक्याठिपक्यांची आहेत. सावरीच्या कापसाचे जणू मऊमऊ गोळेच! इवले कान, इवल्या शेपट्या, लालसर ओली नाकं आणि पोटांतून येणारा 'कुई कुई' आवाज. कितीतरी वेळ मी त्यांच्याकडं बघतच राहिले.

तिथून पुढं गेल्यावर कुत्र्यांचा आणखी एक विभाग लागला. इथं तऱ्हेतऱ्हेची कुत्री आहेत. लठ्ठ आणि रोड. चिडकी आणि शांत. साखळीला सारखे हिसके देऊन काही सुटू बघण्याचा प्रयत्न करणारी, तर काही स्वस्थ बसून राहिलेली.

एका कुत्र्याच्या कानामागं मोठं गळू झालं आहे. एकाचा मोडलेला पाय प्लॅस्टरमध्ये घालून ठेवला आहे. एक कुत्रा चिडून माझ्या अंगावर झेप घेऊ बघतो. मी दचकून मागं सरकते. भरत त्याच्यावर खेकसतो, ''झेन्या, चूप! असं नाही करायचं. आपल्या पाहुण्या आहेत त्या. चूप!''

झेन्या जणू समजल्यासारखा चूप बसतो.

दुसरा एक कुत्रा सारखा झेप घेऊ लागतो; पण तो अंगावर तुटून पडण्यासाठी नव्हे. तो पुढचे दोन्ही पंजे जुळवून मला नमस्कार करतो. झेन्या रागीट, तर हा एकदम सालस. भरत मला म्हणतो, ''आल्या-गेल्या सर्व लोकांना तो असा नमस्कार करतो बाई.''

मी भरतला विचारते, ''इथं आणखी कोणते प्राणी येतात रे?''

''पुष्कळ येतात बाई,'' भरत सांगू लागतो, ''शेळ्या येतात. मेंढ्या, ससे येतात. माकडं येतात.''

आम्ही बोलतो आहोत, एवढ्यात माझ्या पायांजवळून एक मांजरी चाललेली दिसते. भरत मला म्हणतो, ''हात लावा बाई तिला.''

मी तिच्या पाठीवर हात ठेवते. मांजरीचं सर्वांग शहारतं. मग ती सावरते. माझ्याजवळ येते. मी तिला थोपटते, तशी ती प्रेमानं 'गुर्रगुर्र' करू लागते. मी भरतला

विचारते, ''ही अशी दचकली कशी रे?''

भरत सांगतो, ''जन्मापासून आंधळी आहे ती! तुमचा अनोळखी हात म्हणून घाबरली. इथंच जन्मलेलं हे पोर. जन्मापासून ठार आंधळं. डोळे बघाल तर अगदी लख्ख आहेत; पण दिसत मात्र नाही हं. आम्ही हे पिलू पाळलं. आता मोठी मांजरी झाली आहे. इथं ती सगळ्यांना ओळखते. विश्वासानं वावरते. आम्ही तिला बाहेर सोडत नाही. तिथं बिचारीचा कुठं निभाव लागेल?''

हे सारं पाहून मी बाहेर आले. एक वेगळंच जग पाहिलं असं वाटलं! का कुणास ठाऊक, आत शिरताना जे वाक्य वाचलं होतं, ते पुन्हा पुन्हा डोळ्यांपुढे येत होतं– 'आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हांला आम्ही हवे आहोत का?'

**शब्दार्थ : करुणा** – दया. **आवाहन करणे** – विनंती करणे. **उदी** – तपकिरी. **कबरा** – ठिपठिपक्यांचा, चित्रविचित्र रंगाचा. **मार्जार** – मांजर. **किनरा (आवाज)** – बारीक व उंच (आवाज). **सालस** – स्वभावाने नम्र, विनयशील. **हालवून सोडणे** – अस्वस्थ करणे. **कावरेबावरे होणे** – गोंधळून जाणे. **अंगावर तुटून पडणे** – जोराचा हल्ला करणे.



## स्वाध्याय

**प्र. १. पुढील वाक्ये कोणत्या प्राण्यासंदर्भात आहे त्या प्राण्याचे नाव लिहा.**

(अ) ''जन्मापासून आंधळी आहे ती!'' ☐

(आ) सावरीच्या कापसाचे जणू मऊमऊ गोळेच! ☐

**प्र. २. आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **मांजर विभागात मांजरांसाठी असलेल्या विविध सोई** → ☐ ☐ ☐ ☐

(आ) **लेखिकेचे लक्ष वेधून घेण्यासाठी मांजरांनी केलेल्या कृती** → ☐ ☐ ☐ ☐

(इ) **माणसांसाखी मांजरांची दवाखान्यात घेतलेली काळजी** → ☐ ☐

(ई) **डोळे न उघडलेल्या कुत्र्याच्या पिलाची वैशिष्ट्ये** → ☐ ☐ ☐ ☐ ☐

**प्र. ३. 'सर्वच प्राणी माणसाच्या प्रेमासाठी भुकेलेले असतात' हे विधान पाठाधारे पटवून द्या.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) कंसातील शब्दसमूहांचा वाक्यातील रिकाम्या जागी वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(लक्ष वेधून घेणे, आवाहन करणे, निभाव लागणे)

(अ) सुधाकरचा कबड्डीच्या सामन्यात आपल्या मित्रासमोर काहीच ................

(आ) चिमुकली मीताली आपल्या आवाजाने सगळ्यांचे ................

(इ) पोलिसांनी गावकऱ्यांना मदतीसाठी ................

**(आ) दिलेल्या शब्दापुढे कंसातील विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(इवले, शांत, खरखरीत)

(अ) रागीट × (आ) मोठे × (इ) मऊमऊ ×

**(इ) 'जोडशब्द' लिहा.**

(अ) चढ- (ई) इकडून-

(आ) अंथरूण- (उ) आले-



## विचार करा. सांगा.

- **'आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हांला आम्ही हवे आहोत का?' या वाक्यांतून तुम्हांला प्राण्यांबाबतची जाणवणारी संवेदनशीलता तुमच्या शब्दांत व्यक्त करा.**
- **लेखिकेने अनुभवलेली इस्पितळातील प्राण्यांची दुनिया तुमच्या शब्दांत लिहा.**



## लिहिते होऊया.

- **पाऊस कोसळत असताना एक छोटे कुत्र्याचे पिल्लू दाराशी येऊन बसले आहे, अशावेळी तुम्ही काय कराल ते लिहा.**
- **मित्रमैत्रिणींमध्ये चर्चा करून 'जैव विविधतेची गरज' या विषयावर आठ ते दहा ओळींचा निबंध लिहा.**

**उपक्रम :** तुमच्या परिसरातील ज्या घरी पाळीव प्राणी आहेत अशा पाच घरांना भेटी द्या. त्या घरातील लोक पाळीव प्राण्यांची काळजी कशी घेतात याची खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती मिळवा व वर्गात सांगा.

**माझा आवडता प्राणी**

- प्राण्याचे नाव व वर्णन
- त्याच्याविषयीची संवेदनशीलता
- खाद्य, राहण्याचे ठिकाण
- उपयोग
- आवडण्याचे कारण

- **सूचनाफलक तयार करणे.**

एखाद्या गोष्टीची माहिती दुसऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे सूचना हे एक माध्यम आहे. दैनंदिन व्यवहारात अनेक ठिकाणी आपल्याला सूचना द्याव्या लागतात. दुसऱ्याने दिलेल्या सूचना वाचून त्याचा अर्थ समजून घ्यायचा असतो. अपेक्षित कृती योग्य तऱ्हेने होण्यासाठी दिलेल्या सूचनांचे आकलन होण्याचे कौशल्य निर्माण व्हायला हवे. यापूर्वी तुम्ही सूचनाफलक या घटकाचा अभ्यास केलेला आहे. या इयत्तेत तुम्ही स्वत: सूचनाफलक तयार करायला शिकणार आहात.

- **सूचनाफलकाचे विषय**

(१) शाळेतील सुट्टीच्या संदर्भात सूचना.
(२) सहलीसंदर्भात सूचना.
(३) रहदारीसंबंधी सूचना.
(४) दैनंदिन व्यवहारातील सूचना.

- **सूचना तयार करताना लक्षात घ्यायच्या गोष्टी**

(१) सूचना कमीत कमी शब्दांत असावी.
(२) सूचेनेचे लेखन स्पष्ट शब्दांत, नेमके व विषयानुसार असावे.
(३) सूचनेतील शब्द सर्वांना अर्थ समजण्यास सोपे असावेत.
(४) सूचनेचे लेखन शुद्‌ध असावे.

- **सूचनाफलक तयार करा. त्यासाठी खालील नमुना कृतींचा अभ्यास करा.**

**विषय– 'उद्या शहरातील पाणीपुरवठा बंद राहील.'**

**नमुना कृती १**

**दि. ८ नोव्हेंबर**

**जलपुरवठा विभाग**

**पाणीपुरवठा बंद**

**जलपुरवठा विभाग विद्याविहार, पुणे तर्फे कळवण्यात येते, की विद्याविहार या भागातील जलवाहिन्यांच्या महत्त्वाच्या दुरुस्तीच्या कामासाठी १० नोव्हेंबर रोजी पाणीपुरवठा दिवसभर बंद राहील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**

विषय– 'कणखर' गिर्यारोहण संस्थेतर्फे कॅम्पचे आयोजन.

नमुना कृती २

– सूचनाफलक –

दि.१५ एप्रिल

'कणखर' गिर्यारोहण संस्था अमरावतीतर्फे उन्हाळ्याच्या सुट्‌टीत गिर्यारोहणाचा कॅम्प आयोजित केला आहे. संपूर्ण माहिती १४ एप्रिलच्या वृत्तपत्रात आलेली असून अधिक विस्तृत माहिती www.kankhar.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी आपली नाव नोंदणी ३० एप्रिलपर्यंत करावी.

- तुमच्या शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम पाहण्यासाठी पालकांना आवाहन करणारा सूचनाफलक तयार करा.

## भाषासौंदर्य

- खालील म्हणी पूर्ण करा.

(१) मूर्ती लहान पण ...................... .
(२) शितावरून ...................... .
(३) सुंठीवाचून ...................... .
(४) ...................... सोंगे फार .
(५) ...................... खळखळाट फार .
(६) दोघांचे भांडण ...................... .
(७) ...................... सव्वालाखाची .
(८) ...................... चुली .
(९) ...................... आंबट .
(१०) अंथरूण पाहून...................... .
(११) इकडे आड...................... .
(१२) ...................... गावाला वळसा .

P7NBU1

# ११. जीवन गाणे

**नितीन देशमुख :** प्रसिद्ध कवी व लेखक. त्यांच्या विविध विषयांवरील काव्यरचना प्रसिद्ध आहेत. त्यांच्या काव्यातून निसर्ग व निसर्गापासून मिळणाऱ्या विविध गोष्टी यांवरील मार्मिक भाष्य आढळून येते.

निसर्गातील विविध घटक आपल्याला काही ना काही मूल्ये व संस्कार शिकवत असतात. प्रस्तुत कवितेतून कवीने निसर्गातील विविध घटकांकडून शिकता येणाऱ्या गोष्टी थोडक्यात पण मार्मिकपणे मांडल्या आहेत. प्रस्तुत कविता 'किशोर', सप्टेंबर २००९ या मासिकातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**



या सृष्टीचे मंजुळ गाणे
जगणे मजला शिकवून गेले,
झिलमिलणारे चंद्र चांदणे
जगणे मजला शिकवून गेले!

भरकटलेल्या जगात नाही
संस्कारांची जाण कुणाला,
तुळशीवरल्या त्या पणतीचे
जळणे मजला शिकवून गेले!

प्रेम काय ते कुणा न ठावे
नदी सागरा जीव का लावे?
स्वैर होऊनी नदीचे पळणे
जगणे मजला शिकवून गेले!

बुलंद तरीही असे हौसले
पिल्लासाठी किती सोसले,
चिवचिवणाऱ्या चोचीमधले
दाणे मजला शिकवून गेले!

सागराची अथांगता अन्
ही वृक्षाची स्थितप्रज्ञता,
दुसऱ्यासाठी घाव सोसणे
जगणे मजला शिकवून गेले!

**शब्दार्थ :** **मंजुळ** – गोड. **ठाव (ठाऊक) नसणे**– माहित नसणे. **बुलंद** – मजबूत, भक्कम. **हौसले** – निर्धार, ठाम विश्वास. **घाव सोसणे** – दु:ख सोसणे.



## स्वाध्याय

**प्र. १. आकृत्या पूर्ण करा.**

(अ) कवीच्या अनुभवातले जग → [ ] [ ]

(आ) कवीला जगणे शिकवणारे कवितेतील घटक → [ ] [ ] [ ] [ ]

**प्र. २. कवितेच्या आधारे खालील तक्ता पूर्ण करा.**

| कवीला जगणे शिकवणारे घटक | या घटकांपासून कवी काय शिकले |
|---|---|
| (अ) चंद्र, चांदणे | (अ) |
| (आ) पणती | (आ) |
| (इ) नदी | (इ) |
| (ई) पक्षी | (ई) |
| (उ) सागर, वृक्ष | (उ) |

**प्र. ३. स्वमत स्पष्ट करा.**

(अ) ‘बिनभिंतीची शाळा, लाखो इथले गुरु’ हा विचार.

(आ) ‘दुसऱ्यासाठी घाव सोसणे’ या ओळीतील तुम्हांला कळलेला अर्थ.



**चर्चा करूया.**

- **निसर्गातील कोणत्याही पाच गोष्टींपासून तुम्हांला काय काय शिकता येईल, याविषयी मित्रांशी चर्चा करा व वर्गात सांगा.**


P7X7VN

# १२. शब्दकोश (स्थूलवाचन)

दैनंदिन जीवनात आपण सहजपणे अनेक नवीन शब्द वापरतो. हे शब्द सहजपणे आपल्या कानावर पडतात अथवा वाचनातून समजतात. संदर्भानुसार आपण त्यांचे अर्थ लावतो व त्यांचा उपयोग करायला शिकतो. प्रत्येक वेळी त्या शब्दांचा नेमका अर्थ किंवा अर्थच्छटा आपल्याला समजलेली असतेच असे नाही.

भाषिक समृद्धीसाठी शब्दाचा नेमका अर्थ माहीत करून घेणे अत्यंत आवश्यक असते, यासाठी शब्दकोश हे महत्त्वाचे साधन आहे.

यावर्षी आपण शब्दाकोशाची ओळख करून घेणार आहोत. नवीन शब्दांचे अर्थ आपण शब्दकोशात पाहू शकतो. हे शब्द शब्दकोशातून कसे शोधता येतात त्याचे मार्गदर्शन या पाठातून मिळते. नवीन शब्दांचे अर्थ तुम्ही शब्दकोशात पहायला शिकावेत, त्याची सवय तुम्हांला लागावी व शब्दांच्या अर्थांची मजा घेता यावी, या दृष्टीने या पाठाचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे.



(शाळेच्या मधल्या सुट्‌टीमध्ये नेहा व सायली या दोन मैत्रिणींमधील हा संवाद)

**नेहा** : सायली, स्वातंत्र्यदिन-प्रजासत्ताक दिन या शब्दांमधील 'दिन' शब्दाचा अर्थ 'दिवस' असा आहे, हो ना ग?

**सायली** : हो....असाच आहे. का ग?

**नेहा** : अगं, मागच्या धड्यात हा शब्द आला होता, तेव्हा बाईंनी या शब्दाचा अर्थ सांगितला होता 'गरीब'!

**सायली** : दोन्ही शब्द नीट बघितलेस का तू? कसे लिहिले आहेत ते?

**नेहा** : आपण आता पुस्तकातच बघूया. शब्द कसा लिहिलाय ते....

**सायली** : हं. हा बघ मागचा धडा....आणि हा शब्द 'दीन'!

**नेहा** : अरे हो, शब्द एकच असला, तरी दोन्ही शब्द लिहिण्यात फरक आहे.

**सायली** : बरोबर! 'दीन' शब्दात 'दी' दीर्घ आहे. 'दीन' म्हणजे गरीब.
'दिन' शब्दात 'दि' ऱ्हस्व आहे. 'दिन' म्हणजे दिवस.

**नेहा** : शब्दांची किती गंमत आहे ना! अक्षरांत वरवर साम्य आहे; पण लेखनातल्या फरकामुळे अर्थात केवढा फरक!

**सायली** : आपण दोघीजणी असे नवीन शब्द आणि त्याचे विविध अर्थ रोज समजून घेऊया.

**नेहा** : अगं पण कसे? आपल्याला सारखे आपल्या बाईंकडे जावे लागेल अर्थ विचारायला!

**सायली** : अगं नाही. मला माहीत आहे त्याची गंमत. शब्दांचे अर्थ आपले आपण कसे शोधायचे ते मी तुला दाखवते.

सायली आणि नेहा यांच्याप्रमाणेच शब्दांचे अर्थ शोधण्याचा आनंद तुम्हीही घ्यायला हवा आहे. त्यासाठी तुम्ही या पाठातून शब्दकोश म्हणजे काय, त्याची रचना, तो कसा पाहावा याबाबत माहीत करून घेणार आहात.

शब्दकोश म्हणजे काय, त्याची उद्दिष्टे, तो कसा पाहावा हे आपण समजून घेऊया.



मुलांनो, ज्या एका अक्षराने किंवा अक्षरसमूहाने एखादी वस्तू, विचार, कल्पना, भाव, गुण किंवा क्रिया इत्यादींचा अर्थ व्यक्त केला जातो, त्या अक्षरास किंवा अक्षरसमूहास **'शब्द'** असे म्हणतात.

कोश म्हणजे 'संग्रह' तर शब्दकोश म्हणजे 'शब्दसंग्रह' होय. हा झाला शब्दकोश शब्दाचा वाच्यार्थ; पण विकसित भाषांत शब्दसंग्रह आणि शब्दकोश यांच्या स्वरूपात थोडा फरक असतो.

एखाद्या भाषेच्या विशिष्ट क्षेत्रातील मर्यादित शब्दांच्या संग्रहाला 'शब्दसंग्रह' (Glossary) असे म्हणतात; तर त्या भाषेतील बहुतेक सर्व शब्दांचा संग्रह, विशिष्ट रचनापद्धतीचा अवलंब करून दिला असल्यास त्याला **'शब्दकोश'** (Dictionary) असे म्हणतात.

कोशात समाविष्ट केलेल्या शब्दांची रचना पद्धतशीरपणे केलेली असते. संग्रहित केलेल्या शब्दांचा क्रम कोणत्या पद्धतीने लावला आहे ते कळले तर कोणताही शब्द कोठे सहजतेने सापडेल हे नक्की कळते.

अलीकडे सर्व भाषांतील कोशांतील शब्दांची योजना त्या भाषेच्या व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या लिपीतील वर्णांच्या क्रमाने केलेली असते. अशी योजना करताना शब्दांचे आद्य अक्षर किंवा वर्ण विचारात घेतलेला असतो. या पद्धतीमुळे कोशात शब्द कोठे सापडेल हे चटकन ठरवता येते.

## उद्दिष्टे


(१) प्रत्येक शब्दाला विशिष्ट अर्थ असतो, हे कळणे.
(२) शब्दाचा योग्य अर्थ माहीत करून घेण्याची सवय लागणे.
(३) शब्दाच्या अर्थाच्या छटा समजणे.
(४) 'शब्दकोश' ही संकल्पना समजणे.
(५) शब्दकोशाची गरज व महत्त्व लक्षात येणे.
(६) शब्दकोश हाताळता येणे.

**काय असते शब्दकोशात–**

(१) शब्दांचा संग्रह
(२) शब्दांचे प्रमाण उच्चार
(३) व्युत्पत्ती
(४) समानार्थी प्रतिशब्द
(५) संदर्भानुसार बदलणारे शब्दांचे अर्थ
(६) अर्थाचे स्पष्टीकरण करणारे वर्णन किंवा चित्र
(७) प्रसिद्ध लेखकांच्या ग्रंथातील संदर्भ

## शब्दकोश कसा पाहावा?

**शब्दकोश पाहण्याचा क्रम :**




शब्दकोशात एखादा शब्द शोधताना 'अकारविल्हे' म्हणजे 'अ' या अक्षरापासून लावलेला क्रम महत्वाचा असतो. आपण वि. भा. नेमाडे यांच्या 'नव्या युगाचे गाणे' या कवितेतील एका ओळीचे उदाहरण पाहूया.

''अणूरेणूतुनि शब्द प्रगटति... 'चला चला पुढती' विज्ञानाचा प्रकाश आला घडे दिव्य क्रांती'' आता समजा, आपल्याला 'अणूरेणूतुनि', 'प्रगटति', 'विज्ञान', 'प्रकाश', 'दिव्य' आणि 'क्रांती' असे सहा शब्द शोधायचे आहेत.

पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे शब्दांना लागलेले प्रत्यय वगळून, सामान्यरूप वगळून मूळचा शब्दच शोधायचा असतो. 'अणूरेणूतुनि' या शब्दातला–तुनि हा प्रत्यय वगळून मूळ शब्द शोधावा लागेल. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे क्रियापदाचा मूळ धातू शोधायचा असतो, म्हणजे 'प्रगटति' या शब्दाचा 'प्रकट' हा मूळ धातू आपल्याला शोधावा लागेल. **'अणूरेणू', 'प्रकट', 'विज्ञान', 'प्रकाश', 'दिव्य', 'क्रांती'** या सहा शब्दांचा आता आपण क्रम लावू. आपल्या वर्णमालेनुसार यांची पहिली अक्षरे कुठल्या क्रमाने येतात ते पाहू.

आता अर्थातच स्वरापासून सुरू होणाऱ्या शब्दांचा क्रम आधी लागेल. म्हणजे इथे 'अणूरेणू' हा शब्द आधी येईल. त्याचा पहिला क्रमांक, यानंतर उरलेल्या पाचपैकी कुठलं अक्षर आधी येईल?

यात साहजिकच स्वरानंतर येणारे पहिले व्यंजन 'क', म्हणजे दुसऱ्या क्रमांकाला येईल 'क्रांती'. नंतर क्रम येईल 'दिव्य' मधील 'द' चा. मग येतील प्रकट आणि प्रकाश हे शब्द. सर्वांत शेवटी येईल विज्ञान.

आता 'प्रकट' आणि 'प्रकाश' यांत 'प्र' नंतर कुठली अक्षरे येतात? तर 'क' आणि 'का' आता तुम्हीच सांगा. 'क' आणि 'का' यापैकी कोणाचा क्रम आधी लागेल. अर्थात 'क' चा. म्हणून 'प्रकट' आधी येईल आणि 'प्रकाश' नंतर. मग

आता आपला क्रम तयार झाला. 'अणूरेणू', 'क्रांती', 'दिव्य', 'प्रकट', 'प्रकाश', 'विज्ञान' आहे ना सोपे?

यात 'क्रांती', 'प्रकट', 'प्रकाश' यांमध्ये पहिले अक्षर जोडाक्षर आहे. ते कसे शोधायचे? तर 'अ' पासून 'औ' पर्यंतचे शब्द संपले, की जोडाक्षरे सुरू होतात; म्हणजे 'क' पासून 'कौ' पर्यंतचे शब्द संपले, की जोडाक्षरे सुरू होतील. त्यात क्+र=क्र शोधायचा, मग क्रा शोधायचा, त्यावर अनुस्वार असलेले शब्द शोधायचे. तेव्हा आपल्याला 'क्रांती' सापडेल. आता तुम्ही स्वत: शब्दकोशात शब्द पाहायचा सराव करा.

**टीप :** 'क्ष', 'ज्ञ' यांचा क्रम अकारविल्हे लावताना 'ळ' या शेवटच्या व्यंजनानंतर येतो.

शब्दकोश पाहण्याची, हाताळण्याची सवय लागली, की शब्दाचे अर्थ व मोल तुम्हांला कळेल. योग्य जागी योग्य अर्थाचा शब्द तुम्ही वापरू शकाल. समर्पक शब्दमांडणीच्या प्रवासात शब्दकोश हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. या साधनाचे महत्त्व जाणा. तुम्ही आता उच्च प्राथमिक गटात आहात. भाषिक समृद्धीच्या वाटचालीत शब्दकोशाचे महत्त्व जाणावे, यासाठी या पाठाचा अभ्यास करणे योग्य ठरेल.



## स्वाध्याय

प्र. १. नम्रता, अंबर, आलोक, वरद, वनिता, समीर, शर्वरी, शेखर, समिरा, मानसी, माधवी हे शब्द 'अकारविल्हे' प्रमाणे लावा.

प्र. २. तुम्हांला पाठातील एखाद्या शब्दाचा अर्थ शोधायचा असेल तर यापुढे तुम्ही तो कसा शोधाल? सोदाहरण सांगा.

प्र. ३. शब्दकोशाचा तुम्हांला कळलेला उपयोग तुमच्या शब्दांत सांगा.

प्र. ४. शब्दकोशासंबंधी खालील मुद्द्यांना धरून परिच्छेद तयार करा.

| शब्दकोशाचा उपयोग | शब्दकोश पाहण्याची उद्दिष्टे |
| --- | --- |

P873XB

# १३. संतवाणी

(अ)

**संत सेना महाराज :** (इ. स. तेराव्या शतकाचा उत्तरार्ध) प्रसिद्ध संतकवी. संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांचे समकालीन संत सेना महाराज पंढरीचे वारकरी होते. त्यांच्या नावावर सुमारे १५० अभंग आढळतात.

संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन प्रस्तुत अभंगामध्ये केले आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

**आजि सोनियाचा दिवस ।**
**दृष्टीं देखिलें संतांस ।।१।।**

**जीवा सुख झालें ।**
**माझें माहेर भेटलें ।।२।।**

**अवघा निरसला शीण ।**
**देखतां संतचरण ।।३।।**

**आजि दिवाळी दसरा ।**
**सेना म्हणे आले घरा ।।४।।**

सकलसंतगाथा खंड पहिला : संत सेना अभंग
अभंग क्रमांक १५
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

**भावार्थ–** संत सेना महाराज संतभेटीने झालेल्या आनंदाचे वर्णन करताना म्हणतात, ''संतांच्या दर्शनाने आजचा दिवस सोनियाचा झाला असून ज्याप्रमाणे सासरी गेलेल्या मुलीला माहेरी आल्याने आनंद होतो तसा आनंद त्यांना झाला आहे. या आनंदाचे वर्णन करताना पुढे ते म्हणतात, संत चरण दृष्टीला पडल्याने माझा सगळा शीण नाहीसा झाला असून घरी दिवाळी, दसरा या सणांसारखा उत्साह ओसंडून वाहू लागला आहे.''

**शब्दार्थ : आजि** – आज. **देखिलें** – पाहिले. **अवघा** – संपूर्ण. **शीण** – थकवा. **निरसणे** – दूर होणे, नाहीसा होणे.

(आ)

**संत चोखामेळा :** प्रसिद्ध संतकवी. संत चोखामेळा यांचा जन्मशक उपलब्ध नाही. संत चोखामेळा यांच्या अभंगांतून भक्ताच्या हृदयातील कारूण्य जसे प्रकट होते, तशी सामाजिक विषमतेच्या उपेक्षेची खंतही व्यक्त होताना दिसते. भागवत धर्माचे सार त्यांच्या व्यक्तित्वात, त्यांच्या कृती-उक्तीत अनुभवायला मिळते.

संतांच्या सहवासात राहून मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन प्रस्तुत अभंगात केले आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

**चंदनाच्या संगें बोरीया बाभळी ।**
**हेकळी टाकळी चंदनाची ।।१।।**

**संतांचिया संगें अभाविक जन ।**
**तयाच्या दर्शनें तेचि होती ।।२।।**

**चोखा म्हणे ऐसा परमार्थ साधावा ।**
**नाहीं तरी भार वाहावा खरा ऐसा ।।३।।**


सकलसंतगाथा खंड पहिला : संत चोखामेळा अभंग
अभंग क्रमांक ६७
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

**भावार्थ-** संत चोखामेळा म्हणतात, ''ज्याप्रमाणे चंदनाच्या सहवासात बोरी, बाभळी, अन्य झाडे व झुडपे आली तर ती चंदनाप्रमाणे सुगंधी होतात त्याप्रमाणे संतांच्या सहवासातही आलेले सर्वजण भाविक बनतात. मनुष्य जन्माला येऊन परमार्थ साधावा नाहीतर आपले जीवन भूमीला भारभूत ठरेल.''

**शब्दार्थ : संगे** - सोबत. **दर्शनें** - दर्शनाने. **हेकळी** - वाकडी. **टाकळी** - लहान झुडूप. **अभाविक** - भाविक नसलेले.

P8FYYY

• खालील आकृतीत नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांची उदाहरणे दिली आहेत. आकृतीतील शब्दांचा उपयोग करून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.





उदा., १. तुषार गुणी आहे.

२. तो पिवळा चेंडू खेळतो.

३. तुषारला मिठाई आवडते.

## हे नेहमी लक्षात ठेवा.




जीव धोक्यात घालू नका, दरीत डोकावून पाहू नका.

भर रस्त्यात गाडी थांबवू नका, इतरांना जाण्यासाठी व्यत्यय आणू नका.

- घाटातून जाताना घ्यायची काळजी याविषयीचे सूचनाफलक तयार करा.

## मैत्री तंत्रज्ञानाशी

(इयत्ता आठवीतील मीनल व इयत्ता दहावीतील तेजस या दोन बहीणभावंडांतील हा संवाद.)



**तेजस :** मीनल, ए मीनल. अगं, आता आपली शाळा लवकरच सुरू होणार आहे. आपण यावर्षी आणलेली नवीन पुस्तके वाचायला हवीत. तू यावर्षीची नवीन पुस्तके पाहिलीस कां?

**मीनल :** हो दादा, अरे मी पुस्तके वाचली नाहीत; पण बघितली आहेत.

**तेजस :** आवडली का तुला तुझी पुस्तके?

**मीनल :** अरे, मला तर माझी पुस्तके खूपच आवडली. मागील वर्षापेक्षाही या वर्षीची पुस्तके खूपच सुरेख आहेत. नव्या कोऱ्या पुस्तकांचा सुगंध, त्यातील आकर्षक चित्रे, मांडणी मला खूपच आवडली.

**तेजस :** अगं, मला पण माझी पुस्तके खूप आवडली आहेत. अभ्यास करताना नक्कीच मजा येणार आहे.

**मीनल :** अरे, पण नवीन पुस्तकांत सर्व धड्यांखाली चौकटीत काहीतरी दिले आहे. ते काय आहे मला कळलंच नाही.

**तेजस :** दाखव बरं मला काय आहे ते!

**मीनल :** हे बघ. (पुस्तकातील पाठाखालील क्यू. आर. कोड दाखवते.)

**तेजस :** अगं, मीनल हा तर क्यू. आर. कोड आहे.

**मीनल :** क्यू. आर. कोड म्हणजे काय रे दादा? पूर्वीच्या पुस्तकांत तर असं काही दिलं जात नव्हतं!

**तेजस :** अगं, क्यू. आर. कोड म्हणजे क्विक रिस्पॉन्स कोड (Quick Response Code). अगं, मोबाईलवर क्यू. आर. कोड स्कॅनर हे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर डाऊनलोड करावे लागते. या सॉफ्टवेअरद्‌वारे हा क्यू. आर. कोड स्कॅन केल्यानंतर आपल्याला पाठ, कविता, इतर घटक या संबंधीच्या काही लिंक्स दिसतात. त्याद्‌वारा ऑडिओ, व्हिडिओ तसेच इतर पूरक साहित्य आपल्याला पहायला मिळते. आपण ते ऐकू शकतो, पाहू शकतो आणि वाचूही शकतो. अभ्यासासाठी त्याचा आपल्याला पुन्हा पुन्हा वापरही करता येऊ शकतो.

**मीनल :** अरे, हे तर खूपच छान आहे! आपल्या पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधीची माहिती खूपच कमी वेळात उपलब्ध होत असल्यामुळे विविध प्रकारचे साहित्य व माहिती शोधण्यासाठीचा आपला वेळही वाचणार आहे. चल दादा, आपण लगेच आपल्या मोबाईलवर हे ॲप डाऊनलोड करून घेऊया आणि अधिकाधिक माहिती मिळवूया.



## काही पूरक पुस्तके व संदर्भ ग्रंथ

(१) बहिणाबाईंची गाणी– बहिणाबाई चौधरी
(२) फकिरा– अण्णा भाऊ साठे
(३) पूर्वरंग– पु. ल. देशपांडे
(४) विशाखा (कवितासंग्रह)– कुसुमाग्रज
(५) गर्भरेशीम (कवितासंग्रह)– इंदिरा संत
(६) तराळ–अंतराळ– शंकरराव खरात
(७) पक्षी जाय दिगंतरा– मारुती चितमपल्ली
(८) फिरस्ती– उत्तम कांबळे
(९) आमचा बाप आणि आम्ही– डॉ. नरेंद्र जाधव
(१०) मजेत जगावं कसं ?– शिवराज गोर्ले
(११) मास्तरांची सावली– कृष्णाबाई सुर्वे
(१२) निसर्गायन– दिलीप कुलकर्णी
(१३) जोहड– सुरेखा शहा
(१४) पत्रास कारण की....– अरविंद जगताप
(१५) विविध शब्दकोश व विश्वकोश



## महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्स

https://mr.wikipedia.org/wiki/जगदीश_खेबुडकर

http://youtu.bevsQjx2B–73w

http:youtu.beSlygTWH4JNo

https://en.wikipedia.org/wiki/Vasant_Bapat

https://mr.wikipedia.org/wiki/शांता_शेळके


www.shikshansanjivani.com > Thor–Leader

https://mr.wikipedia.org/wiki/चोखामेळा

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेली पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकांशी संबंधित माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.

- खालील चित्राचे निरीक्षण करा. चित्रातील हे दृश्य पाहून सूचनांचे फलक तयार करा.





- खालील चौकटींत काही म्हणींचे अर्थ दिले आहेत ते वाचा. त्यावरून म्हणी ओळखा व लिहा.

न आवडणाऱ्या माणसाने कितीही चांगली गोष्ट केली, तरी ती वाईट दिसते. त्या व्यक्तीचे काम आवडत नाही.

एखाद्या माणसाला काम करता येत नसले, की तो कारणे देत असतो.

एखादी गोष्ट तत्काळ व्हावी याकरता काही लोक उतावळेपणाने जे उपाय करतात त्यांना हे म्हटले जाते.

जे समोर दिसते त्यासाठी कोणत्याही पुराव्याची गरज भासत नसते.

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

मराठी सुलभभारती इयत्ता आठवी

₹ ३०.००

